रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २९८
www.ramprahar.com

◆ रविवार, १७ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२



## अंतरंग


मान्सूनपूर्व तयारीद्वारे राज्यातील यंत्रणा सुसज्ज/२

रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४

वैदेही पाटीलला राज्यस्तरीय जिम्नॅस्टिकमध्ये 'कांस्य'/८


## भारत ही संधींची भूमी -पंतप्रधान नरेंद्र मोदी



**हेग (नेदरलँड्स)** : पंतप्रधान नरेंद्र मोदी नेदरलँड्सच्या दौऱ्यावर असून त्यांनी शनिवारी (दि. १६) हेग येथील कार्यक्रमात भारतीय समुदायाशी संवाद साधला. जग अनेक आव्हानांचा सामना करीत असताना भारत नवोन्मेष, आर्थिक विकास आणि जागतिक सहकार्य या क्षेत्रात एक प्रमुख शक्ती म्हणून उदयास येत आहे, असे त्यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, भारत ही तंत्रज्ञान आणि मानवता या दोन्हींवर आधारित संधींची भूमी आहे. भारत जेव्हा यशस्वी होतो, तेव्हा पूर्ण मानवतेला त्याचा फायदा होतो, पण आज मानवतेसमोर अनेक मोठी आव्हानेही आहेत. आधी कोरोना आला, मग युद्ध सुरू झाले. आता इंधन संकट आहे. हे दशक जगासाठी आपत्तींचे दशक बनले आहे. ही परिस्थिती वेगाने बदलली नाही, तर अनेक दशकांच्या कामगिरीवर पाणी फेरले जाईल. पुन्हा गरिबीच्या दलदलीमध्ये आपण ढकलले जाऊ शकतो.

# आध्यात्मिक वारशातून भारत विश्वगुरू बनेल

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन; श्री श्री रविशंकर यांचा गौरव



**बंगळुरू : वृत्तसंस्था**

भारताला विश्वगुरू बनवण्याचे स्वप्न केवळ आर्थिक किंवा लष्करी सामर्थ्यावर आधारित नाही, तर ते आपल्या समृद्ध आध्यात्मिक वारशात रूजलेले आहे. भारताला आध्यात्मिक महासत्ता बनवण्याचा मार्ग गुरुदेव श्री श्री रविशंकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशस्त होत आहे, असे उद्गार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि.१६) बंगळुरू येथे काढले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी कर्नाटकातील बंगळुरू येथील द आर्ट ऑफ लिव्हिंग इंटरनॅशनल सेंटरला भेट दिली, त्यावेळी ते जनसमुदायाला संबोधित करीत होते. संस्थेच्या मानवतेच्या ४५ वर्षांच्या सेवेनिमित्त व रविशंकर यांनी वयाची ७० वर्षे पूर्ण केल्याबद्दल आयोजित उत्सवाचा हा भाग होता.

या सोहळ्याला राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे, केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे आणि उत्तराखंडचे राज्यपाल अजय कुमार भल्ला प्रामुख्याने उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या भव्य ध्यान मंदिरात सर्व मान्यवरांनी विशेष सत्संगाचा लाभ घेतला.

मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, गुरुदेव हे संपूर्ण जगासाठी भारताचे सर्वात मोठे आध्यात्मिक दूत आहेत. त्यांनी भारताची महान तत्त्वे, वैश्विक ज्ञान जगासमोर अशा प्रभावीपणे मांडले आहे की आज संपूर्ण जगाचे लक्ष भारताकडे वेधले गेले. आर्ट ऑफ लिव्हिंगच्या माध्यमातून लाखो लोकांना त्यांच्या जीवनाचा अंतिम उद्देश सापडत आहे, हाच गुरुदेवांच्या कार्याचा खरा विजय आहे. यावेळी मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्रात आर्ट ऑफ लिव्हिंगने केलेल्या सामाजिक कार्याचाही उल्लेख केला.

### सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर

*मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शुक्रवारी पुण्याहून बंगळुरूला विशेष विमानाऐवजी 'इंडिगो'च्या नियमित प्रवासी विमानाने रवाना झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा वापर करण्याच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून मुख्यमंत्र्यांनी पुन्हा एकदा सामान्य जनतेप्रमाणे प्रवास करून आगळा आदर्श घालून दिला. पुण्यावरून ते 'आर्ट ऑफ लिव्हिंग'च्या कार्यक्रमासाठी बंगळुरूकडे इंडिगोच्या सार्वजनिक विमानातून रवाना झाले.*

# 'नीट' पेपरफुटी : पुण्यातून महिला प्राध्यापक अटकेत

**पुणे : प्रतिनिधी**

देशभरात गाजत असलेल्या 'नीट' प्रश्नपत्रिकाफुटी प्रकरणात पुण्यातील प्राध्यापक मनीषा गुरुनाथ मांढरे हिला केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाने (सीबीआय) पुण्यातून अटक केली. मांढरे ही परीक्षा प्रक्रियेशी (एनटीए) संबंधित आहे. पेपरफुटी प्रकरणात ती सामील असल्याचे उघडकीस आल्यानंतर तिला अटक करण्यात आली आहे.

मनीषा मांढरे जीवशास्त्राची वरिष्ठ प्राध्यापिका आहे. पेपरफुटी प्रकरणात याआधी बिबवेवाडीतील ब्युटीपार्लरचालक महिला मनीषा वाघमारे हिला अटक करण्यात आली होती. वाघमारेने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



करण्यासाठी तिच्या घरी बोलावले होते. तेथे प्रा. मांढरेने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांना प्रश्न, अचूक उत्तरांची माहिती तिने दिली होती. ही बाब तपासात उघडकीस आल्यानंतर प्रा. मांढरेला अटक करण्यात आली, अशी माहिती सीबीआयकडून देण्यात आली. राष्ट्रीय परीक्षा संस्थेकडून (एनटीए) मांढरे हिची तज्ज्ञ म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. तिला वनस्पतीशास्त्र आणि प्राणीशास्त्र विषयांच्या प्रश्नपत्रिकांची माहिती होती. यातील बहुतांश प्रश्न ३ मे २०२६ रोजी झालेल्या नीट-यूजी परीक्षेतील प्रत्यक्ष प्रश्नपत्रिकेशी जुळल्याचे निष्पन्न झाले.

सीबीआयने केलेल्या चौकशीनुसार या प्रकरणात यापूर्वी मनीषा वाघमारे आणि अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथील धनंजय लोखंडे यांना अटक करण्यात आली होती. लोखंडेच्या संपर्कातून पुणे कनेक्शन समोर आल्यानंतर सीबीआयने तपासाची सूत्रे वेगाने हलवली. 'नीट' प्रश्नपत्रिकाफुटी प्रकरणातील मुख्य सूत्रधार प्रा.पी.व्ही. कुलकर्णी यालादेखील नुकतीच अटक करण्यात आली आहे.



**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अमृत महोत्सवी वर्ष साजरे होत आहे. यानिमित्त अंजुमन आय इस्लाम संस्थेचे अध्यक्ष पद्मश्री डॉ. झहीर काझी यांच्या वतीने काळसेकर टेक्निकल कॅम्पसचे डायरेक्टर डॉ. रंजन खाटीक, प्राचार्य आरिफ शेख व मेंटॉर युसूफ मुल्ला यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे अभीष्टचिंतन केले.**

## शुभवार्ता! मान्सून अंदमानमध्ये दाखल



**पोर्ट ब्लेअर : वृत्तसंस्था**

संपूर्ण देशातील नागरिक आणि विशेषतः शेतकरी ज्याची आतुरतेने वाट पाहत होते, तो मान्सून अखेर अंदमानच्या वेशीवर येऊन पोहचला आहे. दरवर्षीपेक्षा यंदा मान्सूनची वाटचाल वेगाने सुरू असून त्याचे हे वेळेआधीच झालेले आगमन बळीराजासह उकाड्याने हैराण झालेल्या सर्वांसाठीच मोठा दिलासा आहे.

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी अत्यंत अनुकूल वातावरणाचा फायदा घेत पुढचा प्रवास वेगवान केला आहे. सर्वसाधारणपणे मान्सून १ जून रोजी केरळमध्ये धडकतो, मात्र यंदा या वाऱ्यांचा वेग पाहता तब्बल पाच ते सहा दिवस आधीच म्हणजेच २६ मेच्या आसपास मान्सून केरळच्या किनारपट्टीवर धडकण्याची दाट शक्यता आहे. पुढील प्रवासासाठी पोषक वातावरण राहिल्यास साधारणतः ६ जूनपर्यंत मोसमी पाऊस महाराष्ट्रात प्रवेश करेल, असा हवामान खात्याचा अंदाज आहे.

## माजी खासदार चषक क्रिकेट स्पर्धा

■ नगरसेवक परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन



**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

गुरुस्मृती फोर्टी प्लस (४०+) शिवाजीनगर यांच्या वतीने पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते तथा विद्यमान नगरसेवक परेश ठाकूर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून भव्य टेनिस क्रिकेट सामन्यांचे आयोजन पनवेल तालुक्यातील शिवाजीनगर येथे करण्यात आले आहे. या माजी खासदार चषक २०२६ स्पर्धेचे शनिवारी (दि.१६) नगरसेवक परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर खेळल्या जात असलेल्या या स्पर्धेत एकूण १६ संघांनी सहभाग घेतला असून पहिल्याच दिवशी खेळाडूंचा मोठा उत्साह पाहायला मिळाला. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभास भाजपचे शिवाजीनगर अध्यक्ष कृष्णाशेठ ठाकूर, उपाध्यक्ष व्ही. के. ठाकूर, पनवेल पंचायत समिती सदस्य जिज्ञासा कोळी, आर. सी. ठाकूर, अमर कडू, राकेश कडू यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेचे मुख्य आकर्षण ठरली ती खेळाडूंना मिळालेली विशेष भेट. क्रीडाप्रेमी नगरसेवक परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व १६ संघांतील खेळाडूंना ब्रँडेड स्पोर्ट्स शूजचे मोफत वाटप करण्यात आले. या खास भेटीमुळे खेळाडूंमध्ये आनंदाचे वातावरण असून आयोजकांनी त्यांचे विशेष आभार मानले. दोन दिवस चालणाऱ्या या क्रिकेट सामन्यांचा बक्षीस वितरण सोहळा रविवारी आहे.




# महापौर आपल्या प्रभागात! प्रभाग १९मध्ये स्वच्छता अभियान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

परिसर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवण्याचा संदेश नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी पनवेल महानगरपालिका क्षेत्रात स्वच्छतेसाठी महापौर आपल्या प्रभागात ही विशेष मोहीम वेगाने राबवली जात आहे. याच मोहिमेंतर्गत शुक्रवारी (दि. १५) प्रभाग क्रमांक १९मध्ये विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात आले. स्वच्छता ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून ते प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे, या भावनेतून स्थानिक नागरिकांनी या मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या अभियानादरम्यान महापौर नितीन पाटील यांनी स्वतः प्रभागाची पाहणी करून दुर्लक्षित राहणाऱ्या आणि कानाकोपऱ्यातील ठिकाणांची प्राधान्याने स्वच्छता करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या. महापौरांच्या सूचनेनुसार मोहिमेदरम्यान विविध ठिकाणी कचरावेचक वाहने आणि घंटागाड्यांच्या माध्यमातून साचलेला कचरा हटवून परिसर पूर्णपणे चकाचक करण्यात आला. या मोहिमेत नालेसफाई, कचरा संकलन आणि सर्वसमावेशक परिसर स्वच्छतेवर विशेष भर देण्यात आला.

स्वच्छतेसोबतच नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी औषध फवारणी विभागाचे पर्यवेक्षक आणि कर्मचारीही या मोहिमेत सक्रिय झाले होते. त्यांनी प्रभागातील आवश्यक आणि संवेदनशील ठिकाणी फॉगिंग तसेच जंतुनाशक स्प्रेईंग करून डास प्रतिबंधक उपाययोजना राबविल्या. या संपूर्ण मोहिमेत मोठ्या संख्येने स्वच्छता निरीक्षक, पर्यवेक्षक आणि स्वच्छतादूत रस्त्यावर उतरले होते.

या वेळी भाजप पनवेल शहराध्यक्ष नगरसेवक सुमित झुंजारराव, नगरसेवक राजू सोनी, नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, अस्मिता घरत, प्रभाग १९चे अध्यक्ष पवन सोनी, शहर सरचिटणीस रुपेश नागवेकर, उपाध्यक्ष केदार भगत, प्रशांत शेटे, अनिमेश ओझे, महेश सरदेसाई, भाजप महिला शहर चिटणीस संजीवनी खिल्लारे यांसह महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ. वैभव विधाते आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

# माझा कचरा माझी जबाबदारी उपक्रमांतर्गत लाभार्थ्यांचा कौतुक सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नो हाऊ फाउंडेशन आणि इनोरा यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच अदानी फाउंडेशनच्या आर्थिक सहाय्यातून राबविण्यात येत असलेल्या माझा कचरा माझी जबाबदारी या अभिनव उपक्रमांतर्गत कंपोस्टर प्लांटर प्रकल्पातील लाभार्थ्यांचा कौतुक सोहळा शुक्रवारी (दि. १५) उत्साहात पार पडला. हा सोहळा कुंडेवहाळ येथील रायगड जिल्हा परिषद शाळेत आयोजित करण्यात आला होता. या विशेष कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून प्रसिद्ध अभिनेत्री अलकाताई कुबल आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे यांचा समावेश होता. या सोहळ्याचे अध्यक्षस्थान पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर यांनी भूषवले.



या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवर आणि प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. यामध्ये अलका कुबल, जिल्हा ग्रामीण विकास प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, सभापती रंजना वास्कर, पंचायत समिती सदस्या मनीषा पाटील, विस्तार अधिकारी महेश घाबडी, संतोष ठोंबरे, सहाय्यक गटविकास अधिकारी राजेंद्र कोलटक्के, सुबोध सिंग, मनुश्री तडवलकर, रुपेश गायकवाड, सदाशिव वास्कर, गजानन पाटील, प्रसाद लिमये, रवींद्र ठाकूर, वैष्णवी निंबाळकर, सुवर्ण शेट्ये, सचिन वास्कर आदी उपस्थित होते.

हा संपूर्ण कार्यक्रम ग्रुप ग्रामपंचायत कुंडेवहाळ, नो हाऊ फाउंडेशन इनोरा पुणे आणि तेजस्विनी ग्रामसंघ कुंडेवहाळ यांच्या सौजन्याने अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला. या उपक्रमामुळे परिसरातील कचरा व्यवस्थापनाला आणि पर्यावरणपूरक कंपोस्टर प्लांटर प्रकल्पाला मोठी चालना मिळत असल्याचे मान्यवरांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले.

# ३ कोटी ३६ लाख २९ हजारांच्या कमाईने 'मरे' मालामाल!

**उरण : प्रतिनिधी**

उरण-नेरूळ-बेलापूर या रेल्वेमार्गावरील उरण, द्रोणागिरी, न्हावा-शेवा, शेमटीखार, खारकोपर, बामण डोंगरी, तारघर, गव्हाण या आठ स्थानकांतून जानेवारी ते एप्रिल २०२६ या चार महिन्यांतच ४५ लाख ६७ हजार ५४२ प्रवासी वाहतूक झाली आहे. मध्य रेल्वेने या चार महिन्यांत ३ कोटी ३६ लाख २९ हजार ५४५ रुपयांची कमाई केली आहे.

जानेवारी २०२४ पासून उरण-नेरुळ-बेलापूर रेल्वेमार्गावरून प्रवासी वाहतुकीला अखंडपणे सुरुवात झाली आहे. जानेवारी ते एप्रिल २०२५ मध्ये या चार महिन्यांत उरण, द्रोणागिरी, न्हावा-शेवा, शेमटीखार, खारकोपर, बामण डोंगरी या सहा स्थानकांतून ४१ लाख ९७ हजार ११७ प्रवाशांची वाहतूक केली होती. या चार महिन्यांत मध्य रेल्वेने दोन कोटी ५६ लाख ८९ हजार ८०७ रुपयांची कमाई केली होती.

त्यानंतर जानेवारी ते एप्रिल २०२६ यादरम्यानच्या चार महिन्यांच्या कालावधीत या रेल्वेमार्गावरील गव्हाण व तारघर ही दोन स्थानके कार्यान्वित झाली. त्यामुळे उरण, द्रोणागिरी, न्हावा-शेवा, शेमटीखार, खारकोपर, बामण डोंगरी, तारघर, गव्हाण या आठ स्थानकांतून जानेवारी ते एप्रिल २०२६ या चार महिन्यांत प्रवाशांच्या संख्येत ३ लाख ७० हजार ४२५ अशी वाढ झाली.



| स्थानक | जाने ते एप्रिल २०२६ तिकीट विक्री | एकूण प्रवासी संख्या |
|---|---|---|
| उरण | ६७३८६१ | ६९३०४१४ |
| द्रोणागिरी | ३५३६६० | २९३२५२७ |
| न्हावा-शेवा | ३७६२४६ | २७१४२२७ |
| शेमटीखार | ९३७४९ | ७६८८२९ |
| खारकोपर | ८९१४१० | ४८५०६९८ |
| बामणडोंगरी | २०२२५९० | १४४६५२६२ |
| तरघर | ६४१२१ | ३६४९६४ |
| गव्हाण | ९१८२५ | ६०२६२४ |

# माधव अभ्यंकरांकडून डॉ. पटवर्धन रुग्णालयास ११ फ्रेम्स सुपूर्द

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील कलाशिक्षक, चित्रकार व वाल्मिकी शाखेचे स्वयंसेवक माधव अभ्यंकर यांनी परिसरातील निसर्गरम्य ठिकाणांची स्वतः काढलेली ११ सुंदर चित्रे फ्रेम करून डॉ. पटवर्धन स्मृती रुग्णालयाला भेट दिली.



रा. स्व. संघ जनकल्याण समिती संचालित या रुग्णालयात रुग्णोपयोगी साहित्य केंद्राच्या आढावा बैठकीपूर्वी प्रातिनिधिक स्वरूपात रुग्णालयात ऑनररी काम करणारे सतीश गुणे यांच्याकडे या निसर्गचित्रांच्या फ्रेम्स सुपूर्द करण्यात आल्या. रुग्णालयाच्या विविध खोल्यांत फ्रेम्स लावण्याची अपेक्षा अभ्यंकर यांनी व्यक्त केली. रुग्णांना शांतता मिळावी या उद्देशाने त्यांनी स्वतःचा वेळ, पैसा खर्च करून चित्रे तयार केली. कार्यक्रमाला रुग्णालयातील व्यवस्थापन समिती सदस्य, रुग्णोपयोगी साहित्य केंद्राचे स्वयंसेवक, महर्षी वाल्मिकी शाखा व नंदनवनचे कार्यवाह व मुख्य शिक्षक उपस्थित होते. हॉस्पिटलचे अधिकारी राजीव समेळ व प्रसन्ना खेडकर यांच्याशी याबाबत चर्चा झाल्याचे मोहन मुजुमदार यांनी सांगितले.

## निवडक

### अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला

**नवीन पनवेल :** पनवेल शहर पोलिसांना कर्नाळा स्पोर्ट्स अकॅडमीच्या बाजूला असलेल्या कातकरवाडीच्या जवळ पडीक एचओसी क्वार्टर्सजवळ झाडाखाली एका ३० ते ३५ वर्षीय इसमाचा मृतदेह आढळला. त्याच्या नातेवाइकांचा शोध पनवेल शहर पोलीस घेत आहेत. त्याचा उजवा डोळा बंद असून डावा डोळा बाहेर आलेला आहे. नाकातोंडातून फेस येत आहे. गळ्यात रुद्राक्ष माळ असून उजव्या हातात स्टीलचे कडे आहे. त्याने अंगात पांढरे आणि जांभळ्या रंगाचा शर्ट आणि कमरेला काळ्या रंगाचा बेल्ट आहे. त्याने निळ्या रंगाची जीन्स पॅन्ट नेसली असून पायामध्ये पांढरे आणि ग्रे रंगाचे स्पोर्ट्स शूज आहेत. या इसमाबाबत अधिक माहिती असल्यास सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन पोवार यांच्याशी संपर्क साधावा.

### विंधणे शाळेतील देवश्री डोईफोडेचे यश

**उरण :** उरण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक उत्कृष्ट शाळा विंधणे शाळेतील इयत्ता पाचवीच्या



वर्गातील कु. देवश्री महादेव डोईफोडे ही विद्यार्थिनी जवाहर नवोदय या विद्यालयात चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होऊन तिने घवघवीत यश संपादन केले आहे. देवश्री डोईफोडेच्या परीक्षेतील यशाबद्दल जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर येथे तिची पुढील शिक्षणासाठी निवड करण्यात आली आहे. या यशाबद्दल देवश्रीचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत असून देवश्रीला मार्गदर्शन करणारे वर्गशिक्षक प्रवीण पाटील, मुख्याध्यापिका स्त्रग्धरा पाटील, देवश्रीचे पालक या सर्वांचेदेखील अभिनंदन करण्यात येत आहे.

### जागतिक डेंग्यू दिनानिमित्त प्रभात फेरी

**नवीन पनवेल :** प्राथमिक आरोग्य केंद्र गव्हाण अंतर्गत उपकेंद्र ओवळे, कुंडेवहाळ येथे शनिवारी (दि. १६) जागतिक डेंगू दिवस साजरा करण्यात आला. यावेळी गावात प्रभात फेरी काढण्यात आली तसेच पथनाट्यदेखील सादर करण्यात आले. त्यानंतर ग्रामस्थांना सभेमध्ये माहिती देण्यात आली आणि गप्पी मासे सोडण्यात आले. कुंडेवहाळ गावातील लोकांना चौकाचौकात गटसभा घेऊन डेंग्यू प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत आरोग्य शिक्षण देण्यात आले. या वेळी विस्तार अधिकारी पंचायत समिती पनवेल, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक, सर्व आरोग्यसेवक, आरोग्यसेविका, तेरणा हॉस्पिटल नर्सिंग विद्यार्थी, आशा सेविका, ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.



# राष्ट्रीय डेंग्यू दिनानिमित्त पनवेल मनपाच्या सर्व आरोग्य केंद्रांच्या वतीने जनजागृतीपर रॅलीचे आयोजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शनिवार १६ मे रोजी राष्ट्रीय डेंग्यू दिनानिमित्त आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार पनवेल महानगरपालिकेच्या वतीने सर्व नागरी आरोग्य केंद्रांमार्फत जनजागृतीपर रॅलीचे आयोजन करण्यात आले. उपायुक्त प्रसेनजित कारलेकर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित जनजागृती कार्यक्रमांतर्गत मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या रॅलीद्वारे नागरिकांना डेंग्यूबाबत माहिती देण्यात आली.




संबंधित आरोग्य केंद्रांच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी रॅलीदरम्यान डेंग्यूची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना, खबरदारीबाबत मार्गदर्शन केले. आरोग्य केंद्रांच्या रॅलीसोबत संबंधित प्रभागांतील स्वच्छता कर्मचाऱ्यांनाही डासांची उत्पत्ती होणारी ठिकाणे कशी ओळखावीत, ती नष्ट करण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात, पुन्हा डासांची उत्पत्ती होऊ नये याबाबत माहिती देण्यात आली. बांधकाम क्षेत्रांमध्ये घ्यावयाची काळजी, धूर फवारणी, औषध फवारणीबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. औषध फवारणीची पद्धत तसेच घरांमधील सर्वेक्षणाबाबतही डॉ. आकाश ठसाळे यांनी माहिती दिली. केंद्र शासनाने यावर्षीच्या 'राष्ट्रीय डेंग्यू दिना'साठी "डेंग्यू नियंत्रणासाठी लोकसहभाग : साठवलेल्या पाणीसाठ्यांची तपासणी करा, स्वच्छता राखा आणि ती भांडी झाकून ठेवा" हा संदेश दिला. त्यानुसार गर्दीची ठिकाणे, महाविद्यालये, भाजी मंडई आदी ठिकाणी परिचारिका व कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात येत आहे. डेंग्यू डासांमुळे होणारा आजार असून त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नागरिकांनी स्वच्छता राखणे, पाणी साचू न देणे, घरातील-घराबाहेरील परिसर स्वच्छ ठेवणे, पाणी साठवणाऱ्या वस्तूंना झाकून ठेवणे अशा उपाययोजना राबविण्याचे आवाहन प्रशासनाने केले. डेंग्यूवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांनी संयुक्तपणे दक्षता घेतल्यास या आजाराला प्रभावीपणे आळा घालणे शक्य होणार आहे.

# आवाजाचे शास्त्रशुद्ध शिक्षण अभिनेत्याला प्रगल्भ बनविते -रंगकर्मी प्रमोद पवार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आवाजाचे एक आगळे वेगळे शास्त्र आहे. त्याचे शास्त्रशुद्ध शिक्षण मिळाले तर तो कलाकार निश्चितच प्रगल्भ होतो. त्यासाठी कलावंतांनी सातत्याने सजग राहावे असे प्रतिपादन ज्येष्ठ अभिनेते, निर्माते, दिग्दर्शक प्रमोद पवार यांनी केले. पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नऊ दिवसांच्या अभिनय प्रशिक्षण शिबिरांतर्गत १५ मे रोजी शिबिरार्थींना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. पवार म्हणाले, कलाकारच नव्हे तर प्रत्येकाने आवाजाची काळजी घेतली पाहिजे. आवाज खणखणीत होण्यासाठी ब्रम्हमुद्रा, सिंह मुद्रा, पर्वतासन, जिव्हा बंध त्यांनी प्रात्यक्षिकातून दाखविले. आवाजाची महती स्पष्ट करताना त्यांनी १९८२ सालच्या टिळक-आगरकर नाटकातील






टिळकांचा एक प्रसंग साकारला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ.राजू पाटोदकर यांनी केले. यावेळी अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे कार्यवाह शामनाथ पुंडे, कविता ठाकूर, गणेश जगताप, स्मिता गांधी उपस्थित होते. मान्यवरांचे मार्गदर्शन नाट्यशिबिरासाठी प्रशिक्षक म्हणून अशोक केंद्रे, संकेत खेडकर, विद्यानाथ सुर्वे, मनोज चिताडे, विक्रांत धीवरे यांचे मार्गदर्शन होत आहे. खारघर, कळंबोली व पनवेल येथे सीनियर व ज्युनिअर गटांत शिबिर सुरू आहे. या उपक्रमांतर्गत १७ मे रोजी अभिनेते महेश कोकाटे यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

# मासेमारी बंदी काळासाठी मच्छीमारांची सज्जता

**उरण : बातमीदार**

खोल समुद्रातील मासेमारी एक जूनपासुन बंद होणार आहे, मात्र त्यापूर्वीच मच्छीमारांनी बोटींची रंगरंगोटी, जाळ्यांची दुरुस्ती अशा कामांची तयारी सुरू केली आहे. मच्छीमारांना यावर्षीच्या हंगामात अनेक संकटांचा सामना करावा लागला. गेल्या वर्षी पावसाळ्यातील बंदीनंतरही अनेक वादळे आल्यामुळे मासेमारी बंद ठेवावी लागली.

अनेकदा खोल समुद्रात जाऊनही मासेमारी न करताच रिकाम्या हातांनी परतावे लागले. परिणामी मच्छीमारांना लाखो रुपयांचे नुकसान सोसावे लागले. त्यातच डिझेल, जाळी, बर्फ यांच्या दरात वाढ झाली. याचाही फटका व्यवसायाला बसला. बदलत्या वातावरणामुळे मासळीचे प्रमाण घटल्याने नुकसान सहन करावे लागते. त्यातच अमेरिका-इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर पुन्हा एकदा डिझेल दरवाढ झाली.



यामुळे मासेमारी व्यवसाय बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे बोलले जात आहे.

खोल समुद्रातील मासेमारीसाठी मच्छीमारांना ५० ते ७० वाव खोल समुद्रात जावे लागते. त्यासाठी दीड ते दोन लाखांपर्यंत खर्च येतो. समुद्राच्या तळाशी असलेली सर्वच प्रकारची मासळी या पध्दतीत पकडली जाते. चांगल्या प्रतिची निर्यात करण्यायोगी असलेली मासळी खोल समुद्रातील मासेमारीत मिळत असल्याने या पध्दतीच्या मच्छीमारांची संख्या राज्यात सर्वाधिक आहे, अशी माहिती स्थानिक मच्छीमारांनी दिली.

जून महिन्यात बंद होणारी मासेमारी ऑगस्ट महिन्यात सुरू होणार आहे. त्यावेळी निरव, शांत झालेल्या सागरात मासेमारीसाठी पोषक वातावरण असेल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. त्यासाठी बोटी सज्ज ठेवण्याची तयारी मच्छीमार करत आहेत. बोटींची रंगरंगोटी, जाळींची दुरुस्ती, इंजिन आणि इतर तत्सम साहित्य सुरक्षित ठेवण्यासाठी मच्छीमारांची लगबग सुरू आहे. यामुळे ससुनडॉक, करंजा, मोरा, कसारा या बंदरांत हजारो बोटींची गर्दी झाली आहे.

# अप्पाडी पोडू... पोडू

## साऊथच्या गीत संगीत नृत्याचा तडका एकदम भारी

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

आपण राजकारणाचे बाजूला ठेवू. ते आपल्याला समजेपर्यंत चाल वा खेळी बदललेली असते. थलपती विजय तमिळनाडूच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान झाला त्या शपथविधीला त्याची प्रेयसी त्रिशा कृष्णनची उपस्थित जास्त लक्षवेधक ठरली हे आपल्या लक्षात येईपर्यंत या दोघांची भूमिका असलेल्या ए.एम. रथनम निर्मित आणि धरानी दिग्दर्शित 'घिल्ली' (२००४) या तमिळ चित्रपटातील तडतडीत गाणे सोशल मीडियावर इतकं आणि असं व्हायरल झालं की ऐकून ऐकून अनेकांना जागच्या जागी नाचावेसे वाटलं असेल, जास्त ऐकल्यावर ते आवडतेही झाले असेल, वाढदिवसाच्या पार्टीपासून क्लब पब डान्सपर्यंत ते पोहचलेही, त्यावर अनेकांचे रिलही बनले आणि भरपूर लाईक्सही मिळाले, लोकप्रियता याला म्हणतात, ती कधी आणि कशी, कुठे मिळेल हे सांगता येत नाही हाच डिजिटल युगाचा फंडा आहे. बरं त्या गाण्याचे तमिळ बोल वा शब्द समजत नाहीत, समजून घेण्याचा प्रयत्न करेपर्यंत ते संपते. या गाण्याचा वेगच तसा आहे.

सुरुवातीला त्या नृत्यातील विजय आणि त्रिशा यांच्या जमलेल्या केमिस्ट्रीचे कौतुक वाटलं. अभिनय करता करता ते एकमेकांकडे आकर्षित झाले आणि विजयच्या राजकारणातील यशात त्याच्या पत्नी आणि दोन मुलांची नाही तर या प्रेयसीची चर्चा रंगली. हे गाणे पडद्यावर आले तेव्हा विजय तीस वर्षांचा तर त्रिशा बावीस वर्षाची होती. आज विजय एकावन्न वर्षांचा आणि त्रिशा त्रेचाळीस वर्षांची आहे. हे गाणे मात्र चिरतरुण आहे.

'घिल्ली' चित्रपटात विजयने कब्बडीपटू वेलूची भूमिका साकारलीय, तो एका स्पर्धेसाठी मदुराई येथे गेला असता गावातील गुंड मुथुपडी (प्रकाशराज) याच्या तावडीतून तो धनलक्ष्मी (त्रिशा कृष्णन) हिला वाचवतो. हा मुथु धनलक्ष्मी हिच्याशी लग्न करण्याच्या प्रयत्नात असतो. त्याचा हा हेतू वेलू हाणून पाडतो, त्यात धनलक्ष्मी त्याच्या प्रेमात पडते आणि हे

अप्पाडी पोडू (म्हणजे काय?) गाणे ते गातात, मनसोक्त, मनमुराद आनंद घेत घेत बेभान बेफाम नाचतात. संगीत विद्यासागर याचे आहे. भारी ठेका पकडला आहे. मास



अपील आहे. अशी गाणी समाजातील खालच्या माणसापर्यंत पोहोचतात. लाऊडस्पिकरच्या माध्यमातून सगळे सण साजरे करतात.

दक्षिणेकडील ठसा आणि ठेका असलेल्या गाण्याची अन्यभाषिकाना भुरळ पडणे नवीन नाही. चित्रपट संस्कृतीतील ही एक वेगळी गोष्ट. चित्रपट अभ्यासात ही हवी. खरंतर संगीताला जात, भाषा, धर्म, प्रांत यांच्या सीमा अथवा मर्यादा नसतात. ते वाहते असते. ते कानाला सुखावणारं ठरले की भाषेची अडचण येत नाही वा येऊ नये. आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीसमोर तर जगभरातील अनेक गोष्टी आहेत, त्यातून एक प्रकारची सांस्कृतिक मिसळणे अथवा घुसळण सुरू आहे, अगदी एखाद्या युवकाला युरोपियन देशातील म्युझिकल ग्रुप माहित्येय, नवीन गायक तो ऐकतो. तो नव्याचा शोध घेत घेत ऐकतोय.

हिंदी चित्रपटसृष्टीवर साऊथच्या संगीताचा फंडा ही गोष्ट खूपच जुनी. एस.रामनाथन दिग्दर्शित 'दो फूल' (१९७३) या चित्रपटात मेहमूदच्या दुहेरी भूमिकेतील एक साऊथ इंडियन असतो आणि त्याची नायिका रमा प्रभा. त्यांच्यावरचे समुद्र किनारी फक्कडबाज प्रेम गीताचे बोल आहेत, मुत्तुकोडी कवाडी हडा. याचा अर्थ असा होतो की, समुद्रातून तूला मी हिरे माणके आणून देईन... गाण्याचा मुखडा तमिळ भाषेत पण गाणं हिंदीत असा भन्नाट



प्रकार. आजच्या भाषेत भन्नाट कॉकटेल. हे गाणे आणि पिक्चर सुपर डुपर हिट ठरले. रसिकांची पसंती हे मोठेच देणं.

यानंतर एक तर साऊथचे चित्रपट हिंदीत डब करुन येताना तिकडचं संगीत आणि त्यावर हिंदी बोल आले. 'हमसे है मुकाबला' या मसालेदार मनोरंजक चित्रपटात प्रभू दूवाचे मुक्काला... ओ लैला गाण्यावरचे भन्नाट नृत्य म्हणजे जणू इलेक्ट्रिक शॉक! प्रभू देवाच्या अंगात स्प्रीग बसवली आहे की काय असे वाटावे. संपूर्णपणे झोकून देऊन नाचानाच काय असते ती त्या गाण्यात दिसते. कमल हसनचीही तीच खासियत. 'हिन्दुस्तानी' (तमिळ चित्रपटाचे नाव 'इंडियन') मधील मनिषा कोईरालासोबतचे टेलिफोन बूथ से गाणे असेच एकदम कडक. 'जिन्स' (१९९८) हा मूळ तमिळ चित्रपट हिंदीत डब करुन येताना तिकडचं प्रशांत आणि ऐश्वर्या राय यांच्यावरचे अम्बे अम्बे हे गाणे मुळ मुखड्यासह लोकप्रिय झाले. नव्वदच्या दशकात चित्रपट रसिकांची नवीन पिढी होती. जागतिकीकरण आणि खुली अर्थव्यवस्था यामुळे हळूहळू जगणं बदलत होते. त्यातला एक भाग म्हणजे चित्रपट संगीतातील नवीन प्रवाह आवडू लागले होते. त्यात एक महत्त्वाचा भाग म्हणजे एमटीव्ही संगीत संस्कृती रूजत गेली.राजकुमार संतोषी दिग्दर्शित 'पुकार' (२०००)मध्ये के सरा सरा गाण्यावर माधुरी दीक्षितने प्रभू देवासोबत तितकेच भारी नृत्य साकारण्याची हौस मौज पूर्ण केली. माधुरी दीक्षित कोणत्याही प्रकारच्या नृत्यात पारंगत आणि त्यासाठी तितकेच भरपूर परिश्रम घेणारी.

दक्षिणेकडील संगीतकार इलया राजा, ए.



आर. रेहमान, आर. आर. करीम यांनी हिंदीत येताना आपल्या मूळ चाली हिंदीत आणल्या. ती गाणी साऊथच्या चित्रपटाच्या स्वरुपाप्रमाणे होती. साऊथच्या अनेक चित्रपटांत नायक नायिकेच्या भोवती नृत्य कलाकारांची मोठी टोळी दिसेल. (पुष्पा द राईज चित्रपटात ते सामी सामी, श्रीवल्ली गाण्यात दिसले) आणि मग गाणेही त्याच लयीतील असते. चित्रपटातील गीत संगीत नृत्याची बहारदार फोडणी हे तिकडच्या चित्रपटाचे वैशिष्ट्य (चित्रपटात गाणीच नसतील तर बजेट वाचेल अशी कंजुषी अजिबात नाही. प्रेक्षकांना भरभरून मनोरंजन देताना गीत संगीत नृत्याची बहारदार फोडणी असावी असा तिकडचा दृष्टिकोन.)


आपल्या देशात उपग्रह वाहिन्यांचे जाळे वाढले, मग यू ट्यूब पाहणं वाढलं आणि साऊथच्या कन्नड, तेलुगू, तमिळ आणि मल्याळम भाषेतील गाणी मूळ भाषेत ऐकण्याची एक वैशिष्ट्यपूर्ण संस्कृती निर्माण झाली. गाणं ऐकायला आवडतेय, पहायलाही छान आहे असं वाटू लागलं आणि अशी अनेक गाणी मराठी व हिंदी चित्रपट शौकीनाना आवडू लागली. साऊथची भाषा भलेही समजत नसेल, कन्नड कोणती आणि तमिळ कोणती हे लक्षात येत नसेल, पण गाण्याचा ठेका आवडतोय, तितकं पुरेसे आहे. हे बदलत्या काळाचे भान आहे.

अशी काही भाषेचे बंधन ओलांडूनही ऐकली गेलीली काही गाणी, गीत गोविन्दम (चित्रपट वचिडम्मा. पडद्यावर हे गाणे विजय देवरकोडा आणि रश्मिका मन्दाना), परायुवान (चित्रपट इश्क, पडद्यावर हे गाणे शेन आणि अन्ना), वासिगारा (चित्रपट मिन्नाल. पडद्यावर हे गाणे माधवन आणि रीमा सेन), अल्लापोरन तमिजान (चित्रपट मेर्सल), डॅडी मम्मी (विल्लू), वासीगारा (मिन्नाले) वगैरे वगैरे अनेक. ठेका आवडला की गाणं पुन्हा एकदा ऐकावेसे वाटतं हा एक अलिखित नियम आहे, तो अशी गाणी लोकप्रिय करतो. म्हटलं तर हे एक प्रकारचे सांस्कृतिक आक्रमण आहे. एक सरमिसळ आहे, पण ती रोखता येणारी नाही. जुन्या पिढीतील चित्रपट संगीत शौकीनानां हे सगळे अजिबात पटणारे वा आवडणारे नाही. साधारण १९७५ सालापर्यंतचे चित्रपट संगीत हेच खरे संगीत. जे. ओम प्रकाश निर्मित आणि गुलजार दिग्दर्शित 'आन्धी'पर्यंतचे संगीत श्रवणीय आहे, रमेश सिप्पी दिग्दर्शित 'शोले'पासून चित्रपट संगीतात गोंगाट आला असे मानणारा मोठा वर्ग आहे.

ते काहीही असले तरी जग अधिकाधिक जवळ येत जाताना त्यात विविध भाषांतील गीत संगीत नृत्याची फोडणी, जोडणी येत येत गेली. फक्त आणि फक्त त्याला कधी काही निमित्त होती. अप्पाडी पोडू असेच एक जबरदस्त सांस्कृतिक आणि माध्यम आक्रमण आहे.

# स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप सोलार योजना

राज्य शासनाने आर्थिकदृष्ट्या दुर्बल वीज ग्राहकांना वीजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण करण्यासाठी "स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप (SMART) सोलार योजना" लागू केली आहे. या योजनेद्वारे गरीब व अल्प वीज वापर करणाऱ्या घरांना छतावरील सौर ऊर्जा प्रणाली बसविण्यासाठी केंद्र शासनाच्या अनुदानासोबत राज्य शासनाकडून अतिरिक्त आर्थिक सहाय्य दिले जात आहे. काय आहे स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप (SMART) सोलार योजना जाणून घेऊ या लेखातून...



गरीब वीज ग्राहकांना सौर ऊर्जेच्या माध्यमातून वीज खर्चातून मुक्त करणे, अतिरिक्त उत्पन्नाचा स्रोत उपलब्ध करून देणे तसेच राज्यातील छतावरील सौर ऊर्जा निर्मिती क्षमतेत वाढ करणे, हा या योजनेचा उद्देश आहे. यामुळे स्थानिक रोजगारनिर्मिती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे.

योजनेची संरचना :– या योजनेंतर्गत दारिद्र्यरेषेखालील सुमारे एक लाख ५४ हजार ६२२ घरगुती वीज ग्राहक तसेच ज्यांचा वीज वार महिन्याला १०० युनिटपेक्षा कमी वीज वापर करणारे तीन लाख ४५ हजार ३७८ आर्थिकदृष्ट्या दुर्बल ग्राहक अशा एकूण पाच लाख घरांना लाभ देण्यात येत आहे.

या योजनेसाठी सन २०२५–२६ या वर्षासाठी रु.३३० कोटी व सन २०२६–२७ या वर्षासाठी ३२५ कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यास तसेच या योजनेंतर्गत महाराष्ट्र वीज वितरण कंपनीस सहाय्यक अनुदान वितरित करण्याकरिता नवीन लेखाशिर्ष उघडण्यास मान्यता देण्यात आली आहे.

**योजनेचे उद्दिष्ट** :–दारिद्र्यरेषेखालील व आर्थिकदृष्टया दुर्बल वीज ग्राहकांना सौर ऊर्जेच्या माध्यमातून वीजेच्या बाबतीत स्वयंपूर्ण बनविणे. दारिद्र्यरेषेखालील व आर्थिकदृष्ट्या दुर्बल वीज ग्राहकांना सौर ऊर्जेच्या माध्यमातून उत्पन्नाचा अतिरिक्त स्रोत निर्माण करुन देणे. छतावरील सौर ऊर्जा निर्मिती क्षमतेत वाढ करणे. स्थानिक रोजगाराच्या संधी वाढवणे व अर्थव्यवस्थेचा विकास करणे.

**योजनेसाठी लागणाऱ्या निधीची तरतूद व लेखाशिर्ष** :– SMART योजना राबविण्याकरीता राज्य शासनावर आर्थिक भार रु. ६५५ कोटी येणार आहे. राज्य शासनाच्या अर्थसंकल्पीय अनुदानातून या योजनेसाठी लागणारा निधी देण्यात येईल. तसेच या योजनेंतर्गत महाराष्ट्र वीज वितरण कंपनी मर्यादित यांस सहाय्यक अनुदान वितरित करण्याकरिता नवीन लेखाशिर्ष उघडून या लेखाशिर्षातर्गत सन २०२५–२६ व सन २०२६–२७ या आर्थिक वर्षांमध्ये आवश्यक तरतूद करण्यात आली आहे. ही योजना केंद्र शासनाच्या योजनेशी संबंधित असल्याने केंद्र शासनाच्या योजनेतील पात्रता, अन्य निकषात बदल, सुधारणा झाल्यास त्या या योजनेस लागू राहतील.

**योजनेची अंमलबजावणी** :– या योजनेच्या अंमलबजावणीकरीता महावितरण कंपनी अंमलबजावणी यंत्रणा म्हणून काम करेल.

**लाभार्थी निवडीचे निकष** :–

* ग्राहकाकडे वैध वीज कनेक्शन असणे आवश्यक आहे.
* ग्राहकाच्या कुटुंबाने छतावरील सौर ऊर्जा प्रणाली आस्थापित करण्यासाठी इतर कोणत्याही अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा.
* इच्छुक ग्राहकाला राष्ट्रीय पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक असेल.
* वीज ग्राहक थकबाकीमुक्त असणे आवश्यक असेल.

**निकष** :– ज्या वीज ग्राहकांचा वीज वापर वर्ष २०२५ (ऑक्टोबर–२०२४ ते सप्टेंबर–२०२५)मधील कुठल्याही महिन्यांत १०० युनिटपेक्षा जास्त नसेल असेच ग्राहक योजनेस भाग घेण्यास पात्र असतील. फक्त सिंगल फेज वीज ग्राहकच योजनेत भाग घेण्यास पात्र असतील.

दारिद्र्यरेषेखालील सर्व ग्राहकांना प्राधान्याने लाभ देण्यात येईल व द्रारिद्र्य रेषेखालील ग्राहक वगळता इतर ग्राहकांसाठी सदर योजना "प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य" या तत्वावर राबविण्यात येईल.

डिसेंबर २०२५पर्यंत योजनेमध्ये दारिद्र्यरेषेखालील ग्राहकांची संख्या एक लाख ५४ हजार ६२२ पेक्षा कमी असल्यास हा कोटा ०–१०० युनिट वापर करणाऱ्या ग्राहकांसाठी वळविण्याचा अधिकार महावितरण कंपनीच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात आला आहे.

**योजनेचा कालावधी** :– या योजनेचा कालावधी मार्च २०२७पर्यंत असेल.

**अंमलबजावणी कार्यपद्धती** :– या योजनेची प्रसिध्दी महावितरण कंपनीद्वारे करण्यात येईल. या योजनेसाठी मुख्य कार्यालय स्तरावर निविदा प्रकाशित करण्यात येईल व त्यानुसार पात्र पुरवठादारांना विभागून काम सोपवले जाईल. अर्ज केलेल्या ग्राहकांच्या जागेची तांत्रिक व्यवहार्यता तपासून तेथे छतावरील सौर ऊर्जा प्रणाली आस्थापित करण्यासाठी परवानगी देण्यात येईल.

निविदेत पात्र पुरवठादारांकडून पात्र ग्राहकांना १ कि.वॅ. क्षमतेची छतावरील सौर ऊर्जा प्रणाली बसविण्यात येईल. आस्थापित करण्यात आलेल्या रुफ टॉप सोलर यंत्रणेची तांत्रिक तपासणी महावितरण कंपनीमार्फत करण्यात येईल. नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांनी ठरविलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच तांत्रिक मानदंडानुसार (Technical Specification) सौर ऊर्जा प्रणाली बसविण्याची तसेच योजनेच्या गुणवत्ता नियंत्रणाची जबाबदारी महावितरण कंपनीची राहील.

या योजनेंतर्गत वापरण्यात येणारे सोलार मोडयुल्स हे केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री सूर्यघर मुफ्त बिजली योजनेप्रमाणे भारतीय बनावटीचे व आयईसी (EC) प्रमाणित किंवा तत्सम राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय मानांकनानुसार प्रमाणित असतील तसेच पुरवठादार हे आरएफआयडी (RFID) टॅग सुविधेसह पुरविणारे असतील. याबाबत महावितरणद्वारा सामग्री पुरवठादारांकडील सामग्रीची तांत्रिक मानदंडानुसार पाहणी करुन त्यांच्या योग्यतेबाबत खात्री करण्यात येईल.

छतावरील सौर ऊर्जा प्रणाली आस्थापित केल्यानंतर पाच वर्षे देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी पुरवठादारांकडे असेल.

पुरवठादाराकडून पाच वर्षासाठीचा सर्वकष देखभाल व दुरुस्ती करार (रु.५००च्या स्टॅम्प पेपरवर) महावितरणकडून करुन घेण्यात येईल.

नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय, भारत सरकार यांनी ठरविलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार तसेच तांत्रिक मानदंडानुसार (Technical Specification) सौर ऊर्जा प्रणाली बसविण्याची व गुणवत्ता नियंत्रणाची जबाबदारी महावितरण कंपनीची राहील..

वित्तीय सहाय्य/अनुदानाच्या रकमेची मागणी करुन हा निधी प्राप्त करून घेण्याची कार्यवाही महावितरणमार्फत करण्यात येईल.

योजनेची अंमलबजावणी करताना त्यासाठी आवश्यक असणारे अर्जाचे विहित नमुने, आस्थापना अहवाल, उपयोगिता प्रमाणपत्र व अनुषंगिक बाबी व तांत्रिक तपासणी नमुना इ. महावितरणमार्फत निर्गमित करण्यात येतील.

राज्य शासनाच्या व इतर आर्थिक स्रोतातून महावितरणमार्फत प्राप्त होणाऱ्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र, भौतिक प्रगती व आर्थिक अहवाल दर तीन महिन्यांनी शासनास सादर करणे आवश्यक आहे.

अशी आहे ही "स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफ टॉप (SMART SCHEME)"... गरजू वीज ग्राहकांनी या योजनेचा लाभ जरूर घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

**–मनोज सानप,**
जिल्हा माहिती अधिकारी,
रायगड–अलिबाग

# उच्च रक्तदाबाच्या वाढत्या समस्येसाठी निष्काळजीपणा कारणीभूत

सत्य समजून घ्या, भ्रमात अनमोल क्षण वाया घालवू नका. होय, सध्या आपण सर्वजण जीवनातील सर्वात आवश्यक घटक वाया घालवणे हेच आपले खोटे मोठेपण समजतो, पण आज आपल्यापेक्षा मूर्ख कोणीही नाही. या बाबतीत प्राणी आणि पक्षीसुद्धा आपल्यापेक्षा जास्त हुशार आहेत. इथे आपण आरोग्याबद्दल बोलत आहोत, जे सातत्याने ढासळत आहे ते प्रदूषण, आपली खादाड जीभ, निष्काळजीपणा आणि भेसळ यांमुळे...

वैद्यकीय क्षेत्र वेगाने प्रगती करत आहे, कारण आपल्या देशात वर्षानुवर्षे आजारांमध्ये वाढ होत आहे आणि आज आपण ज्या प्रकारच्या प्रदूषित आणि तणावपूर्ण वातावरणात जगत आहोत, त्यामुळे भविष्यात हे आजार अधिक धोकादायक रूप धारण करतील. इतर ठिकाणांप्रमाणे, रुग्णालयात कोणतीही सौदेबाजी होत नाही; डॉक्टर ज्या चाचण्या किंवा औषधे लिहून देतात, ती आवश्यकच समजून पैसे खर्च करावे लागते. आजारांच्या वाढीसाठी आपण स्वतःच बहुतांशी जबाबदार आहोत. आज बहुतेक मृत्यू हृदयाच्या समस्यांमुळे होतात, कारण आपण निरोगी हृदयाची योग्य काळजी घेऊ शकत नाही. उच्च रक्तदाब ही हृदयविकारांसाठी एक महत्त्वाची समस्या आहे आणि आपल्या वाईट सवयी उच्च रक्तदाबाची समस्या निर्माण होण्यास जबाबदार आहेत. आज जागतिक उच्च रक्तदाब दिन, जाणून घेऊ त्याविषयी...



उच्च रक्तदाब ही जगभरातील सर्वात सामान्य आरोग्य समस्या आहे. लाखो लोकांना याचा त्रास होत असूनही अनेकदा याकडे दुर्लक्ष केले जाते. अनेकदा कोणतीही स्पष्ट लक्षणे न दिसता हा आजार वाढत जातो, म्हणूनच डॉक्टर आणि आरोग्य तज्ज्ञ याला 'सायलेंट किलर' (शांत मारेकरी) म्हणतात. जर लवकर निदान झाले नाही, तर उच्च रक्तदाबामुळे महत्त्वाच्या अवयवांना नकळत नुकसान पोहोचू शकते आणि हृदयविकार, पक्षाघात, मूत्रपिंड निकामी होणे आणि इतर जीवघेण्या आजारांचा धोका लक्षणीयरीत्या वाढू शकतो. बहुतेक प्रकरणांमध्ये, लोक कोणत्याही धोक्याच्या चिन्हांकडे लक्ष न देता आपले दैनंदिन जीवन जगत असतात. परंतु, जेव्हा रक्तदाब खूप वाढतो, तेव्हा तीव्र डोकेदुखी, चक्कर येणे, छातीत दुखणे, अंधुक दिसणे, श्वास घेण्यास त्रास होणे किंवा हृदयाचे ठोके अनियमित होणे यांसारखी लक्षणे दिसू शकतात. दुर्दैवाने, पक्षाघात किंवा हृदयविकाराच्या झटक्यासारखी गंभीर वैद्यकीय आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यावरच अनेक लोकांना त्यांच्या गंभीर स्थितीबद्दल कळते. आज जगभरातील उच्च रक्तदाबाच्या रुग्णांची वाढती संख्या आधुनिक जीवनशैलीमुळे होत आहे. धावपळीची जीवनशैली, जास्त मीठ असलेले प्रक्रिया केलेले पदार्थ, पॅकेज केलेले पदार्थ, चरबीयुक्त पदार्थ, साखर, तेल, मैदा, मसाले यांनी भरलेले जड जेवण, रात्री उशिरापर्यंत जागे राहणे, पुरेशी झोप न मिळणे, आळस, तंबाखूचे सेवन आणि अति मद्यपान या सर्वांमुळे उच्च रक्तदाब वाढतो. काही विशिष्ट औषधे घेतल्यानेही उच्च रक्तदाबाचा धोका वाढू शकतो. आनुवंशिकता आणि कौटुंबिक इतिहासामुळेदेखील उच्च रक्तदाबाचा धोका वाढतो.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, सध्या जगभरातील १.४ अब्जाहून अधिक प्रौढ व्यक्ती उच्च रक्तदाबाने ग्रस्त आहेत, परंतु दुर्दैवाने यापैकी अनेक प्रकरणे लक्षात येत नाहीत किंवा त्यांचे योग्य व्यवस्थापन होत नाही. अनियंत्रित उच्च रक्तदाबाचे दीर्घकालीन परिणाम गंभीर असू शकतात. यामुळे हृदय निकामी होणे, छातीत दुखणे किंवा हृदयविकाराचा झटका येऊ शकतो, ज्यामुळे पक्षाघाताचा धोका वाढतो. मूत्रपिंड विशेषतः असुरक्षित असतात, कारण उच्च रक्तदाबामुळे शरीरातील टाकाऊ पदार्थ प्रभावीपणे गाळण्याची त्यांची क्षमता कमी होते आणि दृष्टीवरही परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे विचार करण्याची क्षमता कमी होते.

उच्च रक्तदाब हा एक असा आजार आहे, ज्याला प्रतिबंध करता येतो आणि नियंत्रणात ठेवता येतो. आपल्या दैनंदिन दिनचर्येत बदल करणे हे सर्वात प्रभावी पाऊल आहे. फळे, पाल्याभाज्या, कडधान्य आणि कमी चरबीयुक्त दुग्धजन्य पदार्थांचा समावेश असलेला आरोग्यदायी आहार हृदयाचे आरोग्य लक्षणीयरीत्या सुधारू शकतो. मिठाचे सेवन कमी करणे, सामान्य वजन राखणे, नियमित व्यायाम करणे आणि सर्व प्रकारची मादक द्रव्ये टाळणे यामुळे उच्च रक्तदाबाचा धोका कमी होऊ शकतो. आरामदायी विश्रांती, पुरेशी झोप आणि आनंदी वातावरण यांद्वारे तणावाचे व्यवस्थापन केल्यास रक्तदाबाची पातळी चांगली राखण्यास मदत होऊ शकते. समस्या गंभीर असेल, तर केवळ जीवनशैलीतील बदल पुरेसे नाहीत.

रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी डॉक्टर औषधेदेखील लिहून देऊ शकतात. रक्तदाबाची नियमित तपासणी करणे आवश्यक आहे, कारण लवकर निदान झाल्यास जीव वाचू शकतो. रक्तदाब समजून घेणे आणि त्यावर नियंत्रण ठेवणे ही निरोगी भविष्यासाठी महत्त्वाची पावले आहेत. निरोगी राहण्यासाठी हिरवेगार आणि स्वच्छ पर्यावरण आवश्यक आहे. नेहमी जागरूक राहून, आरोग्यदायी सवयी अंगीकारून आणि वेळेवर उपचार घेऊन, उच्च रक्तदाब सारख्या इतर ही अनेक आजारांवर नियंत्रण मिळवून आपण आरोग्याचे रक्षण करू शकतो.

**–डॉ. प्रितम गेडाम**

# मध्य रेल्वेकडून कोकणवासीयांना दिलासा

## ■ सावंतवाडी, मडगावसाठी १० अतिरिक्त उन्हाळी विशेष गाड्या चालवणार



**रोहा : प्रतिनिधी**

मुलांना शाळेची उन्हाळी सुट्टी पडल्यामुळे मोठ्या प्रमाणात कोकणवासीय आपल्या गावी जात आहेत. परंतु मोठ्या प्रमाणात रेल्वे बस खाजगी बसेस यांना गर्दी दिसत असल्यामुळे प्रवाशांना त्रास होताना दिसत आहे. त्यामुळे प्रवाशांच्या मागणीनुसार रेल्वे कोकणमार्गावर १० अतिरिक्त उन्हाळी विशेष गाड्या चालवणार आहे. याचा फायदा कोकणवासीयांना होणार असल्यामुळे त्यांना दिलासा मिळाला आहे. ८ गाड्या सावंतवाडीसाठी आणि २ गाड्या मडगावसाठी चालवण्यात येणार आहेत.

चालवण्यात येणाऱ्या गाड्यांमध्ये पनवेल-सावंतवाडी रोड साप्ताहिक विशेष (८ गाड्या) गाडी क्रमांक ०१००७ साप्ताहिक विशेष गाडी दिनांक १६.०५.२०२६ ते दिनांक ०६.०६.२०२६ पर्यंत दर शनिवारी पनवेल येथून १८.१० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ०४.३० वाजता सावंतवाडी रोड येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०१००८ साप्ताहिक विशेष गाडी दिनांक १६.०५.२०२६ ते दिनांक ०६.०६.२०२६ पर्यंत दर शनिवारी सावंतवाडी रोड येथून सकाळी ०७.२० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी १७.०० वाजता पनवेल येथे पोहोचेल.

या गाडीला पेण, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, अडावली, विलावडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, नांदगाव रोड, कणकवली, सिंधुदुर्ग आणि कुडाळ हे थांबे देण्यात आले आहेत. पनवेल- मडगाव विशेष गाड्या (२ सेवा) गाडी क्रमांक ०११०५ साप्ताहिक विशेष गाडी सोमवार, दिनांक १८.०५.२०२६ रोजी पनवेल येथून सकाळी ०५.४५ वाजता सुटेल आणि त्याच दिवशी १८.१० वाजता मडगाव येथे पोहोचेल. गाडी क्रमांक ०११०६ साप्ताहिक विशेष गाडी रविवार, दिनांक १७.०५.२०२६ रोजी मडगाव येथून दुपारी १६.३० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ०४.०० वाजता पनवेल येथे पोहोचेल.

या गाडीला पेण, रोहा, माणगाव, खेड, चिपळूण, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, अडावली, विलावडे, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड, थिवि आणि करमळी हे थांबे देण्यात आले आहेत. गाडी क्रमांक ०१००७ साठी विशेष शुल्कावर बुकिंग सुरू झाले आहे.आणि गाडी क्रमांक ०११०५ साठी विशेष शुल्कावर बुकिंग दिनांक १६ मे रोजी सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in या संकेतस्थळावर सुरू होईल.

अनारक्षित डब्यांसाठी सामान्य शुल्कासह बुकिंग यूटीएस (UTS) प्रणालीद्वारे करता येईल. प्रवासी तिकीट बुकिंगसाठी रेलवन (RailOne) ॲपदेखील डाउनलोड करू शकतात. विशेष गाड्यांच्या थांब्यांवरील वेळापत्रकासाठी कृपया www.enquiry.indianrail.gov.in या संकेतस्थळावर भेट द्या किंवा एनटीईएस (NTES) ॲप डाउनलोड करा, असे आवाहन मध्य रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# कोकण किनारपट्टीवर १ जूनपासून यांत्रिकी नौकांना मासेमारी बंदी



**अलिबाग : प्रतिनिधी**

कोकण किनारपट्टीवर १ जून ते ३१ जुलै या कालावधीत यांत्रिकी नौकांना मासेमारी बंदी करण्यात आली आहे. सहाय्यक मत्सव्यवसाय विभागाने हे आदेश जारी केले आहेत. मासेमारी बंदी कालावधीत नौका मासेमारीसाठी गेल्या आणि त्यांना अपघात झाल्यास त्यांना कोणतीही नुकसान भरपाई शासनाकडून मिळणार नाही.

नौका पुनर्वसनासंबंधीचा प्रस्ताव विचारात घेण्यात येणार नाही. बंदी कालावधीत अपघाताने मच्छीमारांवर मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसांना कोणत्याही प्रकारची मदत अर्थसहाय्य शासनाकडून मंजूर कले जाणार नाही, बंदी कालावधीत ज्या मासेमार संस्थांच्या सभासदांच्या नौका मासेमारी करताना आढळतील त्यांच्यावर महाराष्ट्र सागरी मासेमारी नियमन अधिनियम सुधारणा २०२१ चया कलमांमधील तरतुदीनुसार कारवाई केलीा जाईल. आर्थिक दंड आणि जप्तीची कारवाई केली जाईल, असा इशारा मत्स्यव्यवसाय विभागाने दिला आहे.

या कालावधीमध्ये मासळी व सागरी प्राण्यांचे मोठ्या प्रमाणात प्रजनन होत असते. तसेच समुद्रात नद्यांद्वारे मोठ्या प्रमाणात खनिजद्रव्य वाहत जातात. त्याचप्रमाणे क्षारतेचे प्रमाण कमी होते आणि अपवेलिंगमुळे देखील समुद्राच्या तळातील मुलद्रव्ये पाण्याच्या वरच्या थरात येतात. त्यामुळे प्लवंग निर्मिती मोठया प्रमाणावर होऊन मासळीच्या लहान जीवांना पोषक वातावरण तयार होते. परिणामी मासळीच्या साठयाचे जतन होते. त्याशिवाय या कालावधीत वादळी हवामान असल्याने जीवित व वित्तहानी होण्याची शक्यता असते. त्यापासून मच्छीमारांचे संरक्षण व्हावे या हेतूने या कालावधीत यांत्रिक मासेमारी नौकांना मासेमारीस बंदी घालण्यात आली आहे.

**बंदी कालावधीत कोणतीही यांत्रिक मासेमारी नौका कोणत्याही कारणास्तव समुद्रात जाणार नाही याची स्थानिक मच्छीमार संस्थांनी दक्षता घ्यावी.**

**-संजय पाटील, सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय**

# मध्य रेल्वेचा महसुलात उच्चांक; एप्रिल २०२६मध्ये ५७०.४२ कोटी रुपयांचा महसूल

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या मुंबई विभागाने एप्रिल २०२६ मध्ये दमदार महसूल कामगिरी नोंदवली असून एप्रिल २०२५ मधील ५२८.१७ कोटी रुपयांच्या तुलनेत एकूण ५७०.४२ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे, जे मागील वर्षीच्या याच महिन्याच्या तुलनेत ८% वाढ दर्शवते. ही वाढ कोचिंग, किरकोळ आणि तिकीट तपासणी या विभागांमधील सुधारित कामगिरीमुळे झाली आहे, जी प्रवाशांची सातत्यपूर्ण मागणी आणि महसूल वसुलीसाठी केलेल्या वाढीव प्रयत्नांना दर्शवते.

एप्रिल २०२६ मधील एकूण कोचिंग महसूल एप्रिल २०२५ मधील ३२०.६० कोटी रुपयांच्या तुलनेत १०.१२% वाढून ३५३.०६ कोटी रुपये झाला आहे. इतर कोचिंग महसुलात ४१.२६% ची उल्लेखनीय वाढ दिसून आली असून, तो मागील वर्षीच्या ३५.६३ कोटी रुपयांवरून ५०.३३ कोटी रुपयांवर पोहोचला आहे. मुंबई विभागाच्या तिकीट तपासणी मोहिमांवर लक्ष केंद्रित केल्यामुळे लक्षणीय परिणाम दिसून आले असून, एप्रिल २०२५ मधील ६.०७ कोटी रुपयांच्या तुलनेत तिकीट तपासणीतून मिळणारा महसूल १६५.८९% नी वाढून १६.१३ कोटी रुपयांवर पोहोचला आहे.

भाडे-व्यतिरिक्त महसुलाच्या आघाडीवर, मुंबई विभागाने एप्रिल २०२६ मध्ये एकूण १३.४४ कोटी रुपयांचा किरकोळ महसूल नोंदवला, जो एप्रिल २०२५ मध्ये मिळवलेल्या ११.६२ कोटी रुपयांपेक्षा १५.६३% जास्त आहे. विशेषतः, अनेक नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या मदतीने, भाडे-व्यतिरिक्त महसूल एप्रिल २०२५ मधील ७.७६ कोटी रुपयांवरून ३२.३८% वाढून १०.२७ कोटी रुपयांवर पोहोचला.

भाडे-व्यतिरिक्त महसुलाला चालना देण्यासाठी, विभागाने खालील उपाययोजना मध्ये

ठाणे, पनवेल, ट्रॉम्बे आणि तारघर स्थानकांवर 'आउट ऑफ होम' (OOH) होर्डिंगचे कंत्राट, ज्यातून ५ वर्षांच्या कालावधीसाठी ३.५५ कोटी रुपये मिळाले. ईएमयू रेकच्या बाहेरील विनाइल रॅपिंगसाठी ५ वर्षांकरिता ८८.६९ लाख रुपयांची तीन कंत्राटे देण्यात आली. गाडी क्रमांक २२२२९ वंदे भारत एक्सप्रेससाठी नवीन जाहिरात करार अंतिम करण्यात आले ट्रेनमधील खाद्यपदार्थ/स्नॅक ट्रेच्या मागील बाजूच्या जाहिरातीसाठी प्रति वर्ष १५ लाख रुपये आणि हेडरेस्टवरील जाहिरातीसाठी प्रति वर्ष १६.८३ लाख रुपये, दोन्ही ३ वर्षांसाठी. याव्यतिरिक्त, गाडी क्रमांक २२१७७/७८ महानगरी एक्सप्रेसमधील अंतर्गत जाहिरातींमधून ५ वर्षांसाठी प्रतिवर्षी १३.२२ लाख रुपये उत्पन्न मिळेल. निळजे आणि तारघर स्थानकांवर ३ वर्षांसाठी प्रतिवर्षी ८.५० लाख रुपयांचे रेल डिस्प्ले नेटवर्क (RDN) कंत्राट देण्यात आले आहे.

याशिवाय डोंबिवली आणि ठाकुर्ली स्थानकांदरम्यान ५ वर्षांसाठी १६.१२ लाख रुपयांची गेमिंग झोन सुविधा आणि कल्याण रेल्वे रुग्णालय, एनजीएसएम गुड्स शेड, कळंबोली गुड्स शेड व तळोजा गुड्स शेड येथे ५ वर्षांसाठी प्रतिवर्षी ८.८४ लाख रुपयांचे चार नवीन वेटिंग रूम-कम-कँटीन कंत्राट देखील देण्यात आले आहेत. लोकमान्य टिळक टर्मिनस, कसारा आणि वासिंद स्थानकांवरील तीन किराणा/फोटोकॉपीअर स्टोअरच्या कंत्राटांमधून ५ वर्षांसाठी प्रतिवर्षी ४९.३३ लाख रुपये मिळतील. इतर उपक्रमांमध्ये माथेरान स्थानकावर ३ वर्षांसाठी प्रतिवर्ष २ लाख रुपयांच्या मिळकतीसह आरामदायी मसाज खुर्च्या आणि

भांडुप, दादर, कांजूरमार्ग, विठ्ठलवाडी आणि डोंबिवली स्थानकांवर ५ वर्षांसाठी ९.१६ लाख रुपयांसह आपत्कालीन वैद्यकीय कक्ष (EMR) सुविधा यांचा समावेश आहे.

दरम्यान, महसुलातील वाढ मध्य रेल्वेचे प्रवासी सेवा, परिचालन कार्यक्षमता व नाविन्यपूर्ण भाडे-व्यतिरिक्त उपक्रमांवर असलेले लक्ष दर्शवते. मध्य रेल्वे सातत्यपूर्ण परिचालन कामगिरी व रेल्वे संसाधनांचा सर्जनशील व्यावसायिक वापर यांद्वारे महसूल वाढवण्यासाठी कटिबद्ध आहे.

# रामेश्वर मंदिर चौल : इतिहास, श्रद्धा आणि सांस्कृतिक वारसा

**रेवदंडा : प्रतिनिधी**



रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यात वसलेले ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्व असलेले चौल गाव आपल्या समृद्ध सांस्कृतिक वारशासाठी ओळखले जाते. या चौल गावातील प्राचीन रामेश्वर मंदिर चौल हे भाविकांचे श्रद्धास्थान मानले जाते. निसर्गरम्य परिसर, प्राचीन वास्तुकला आणि धार्मिक परंपरा यामुळे हे मंदिर परिसरातील एक महत्त्वाचे आकर्षण ठरले आहे.

भगवान शंकराला समर्पित असलेल्या या मंदिराचा इतिहास अनेक शतकांपूर्वीचा असल्याचे सांगितले जाते. मंदिराची बांधणी पारंपरिक कोकणी शैलीत करण्यात आली असून दगडी बांधकाम, सुबक कोरीव काम आणि शांत वातावरण भाविकांना आध्यात्मिक समाधान देत असते. श्रावण महिना, महाशिवरात्री तसेच विविध धार्मिक उत्सवांच्या काळात येथे मोठ्या प्रमाणावर भक्तांची गर्दी पाहायला मिळते.

स्थानिक ग्रामस्थांच्या मते रामेश्वर मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून गावाच्या सांस्कृतिक एकतेचे प्रतीक आहे. मंदिर परिसरात होणारे कीर्तन, भजन, धार्मिक कार्यक्रम आणि उत्सव यामुळे चौल गावातील पारंपरिक संस्कृती आजही जपली जात आहे. चौल परिसर ऐतिहासिकदृष्ट्याही महत्त्वाचा मानला जातो. पोर्तुगीज काळातील वास्तू, समुद्रकिनारे आणि प्राचीन मंदिरे यामुळे येथे पर्यटनालाही चालना मिळत आहे. त्यामुळे रामेश्वर मंदिराला भेट देण्यासाठी केवळ भाविकच नव्हे, तर पर्यटकदेखील येथे मोठ्या संख्येने येत असतात.

# जड-अवजड वाहनांकरिता वाहतूक बंदी अधिसूचना जारी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

पोलीस अधीक्षक रायगड यांच्याकडील पत्राचे अवलोकन करता स्थानिक नागरिक व पर्यटकांचा प्रवास सुखकर होण्याच्या दृष्टिकोनातून व अपघात टाळण्याच्या दृष्टिकोनातून तसेच कालेखिंड ते कनकेश्वर फाटा (चॅम्पियन चौक) या मार्गाचे काम सुरळीत आणि दिलेल्या कालावधीमध्ये पूर्ण करण्याच्या उद्देशाने या आदेशाचे दिनांकापासून ते दि.३१ मेपर्यंत या मार्गावरील जड-अवजड वाहनांना वाहतूक बंदी अधिसूचना जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जारी केली आहे.

कार्लेखिंड ते कनकेश्वर फाटा (चॅम्पियन चौक) या मार्गावरील सर्व प्रकारच्या जड-अवजड वाहनांची वाहतूक ही या आदेशाचे दिनांकापासून दि. ३१ मेपर्यंत पूर्णपणे बंद करुन या कालावधीमध्ये पर्यायी मार्ग म्हणून कार्लेखिंड-पिंपळभाट-अलिबग रिलायन्स बायपास चौक-बायपास रोड ते अलिबाग रेवसनाका-बुरूमखान-मानी फाटा मार्गे आरसीएफ कंपनी थळ-ते कनकेश्वर फाटा-चोंढी मांडवा अशी व मांडवा मार्गे येणारी वाहतूक ही मांडवा चोंढी मार्गे आरसीएफ कंपनी थळ-मानी फाटा मार्गे अलिबाग रेवस नाका-बायपास रोड-रिलायन्स चौक-पिंपळभाट मार्गे कार्लेखिंड मार्गे पोयनाड अशी जड-अवजड वाहनांची वाहतूक करण्याचे आदेश जारी केले आहेत.

ही वाहतूक बंदी अधिसूचना दूध, पेट्रोल, डिझेल, स्वयंपाकाचे गॅस, औषधे, ऑक्सीजन, भाजीपाला, पाणी आदी जीवनावश्यक वस्तू वाहून नेणारी वाहने, पोलीस वाहने, फायर ब्रिगेड वाहने रुग्णवाहिका यांना लागू राहणार नाही.

# सणसवाडीत जय अंबे माता मंदिराचा वर्धापन दिन उत्साहात

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील विळे भागाड एमआयडीसी सणसवाडी हे गाव प्रेरणादायी गाव म्हणावे लागेल असे सर्वे पंचक्रोशीतून बोलले जात आहे. रविवारी १० मे व ११ मे या दोन्ही दिवशी जय आंबेमाता २६वा वर्धापन दिवस व जय आंबे नवतरुण मुंबई ,सुरत व ग्रामस्थ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने वर्धापन दिवस व ५०वा मंडळाचा सुवर्णमहोत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्ताने रविवारी अभिषेक, कलशपूजन ध्वजारोहण, प्रार्थना, प्रवचन, हरिपाठ व कीर्तनरूपी सेवेतून साजरा करण्यात आला.

ग्रामस्थ मंडळ मुंबई मंडळ, लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत डोळ्याचे शिबिराचा लाभ देण्यात आला. ६०/७० जणांनी लाभ घेतला. सोमवारी ११ मे रोजी सत्यनारायणाची पूजा, पालखी सोहळा आयोजित केले होते. संपूर्ण गाव पालखी सोहळ्यात भक्तिमय झाले होते. मंडळाने ५०वा वर्धापन दिनानिमित्त निमित्त जेष्ठ नागरिकांना काठी ची भेटवस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. महिलांचे हळदीकुकू व विविध क्षेत्रातील मानवरांचा सत्कार करण्यात आला. मराठी पाऊल पडते पुढे मुंबई या ऑर्केस्ट्राचे मनोरंजनासाठी नियोजन करण्यात आले. संपूर्ण पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मनमुराद आनंद घेतला.

कीर्तनकर रायगड भूषण पुरस्कार हभप किरण महाराज यांचा सत्कार ग्रामस्थ मंडळाचे चेअरमन भारत म्हस्के, सेक्रेटरी मधुकर कदम व जय आंबे नवतरुण मंडळाचे सल्लागार गणपत जाधव यांच्या हस्ते करण्यात आला. मंडळाची ५० वर्षापासून राखत आलेली एकजुटता व उपक्रम राबवून ५० वर्षे मंडळ टिकून ठेवणे हे मोठमोठ्या संस्थांना न जमणारे कार्य या छोट्याशा गावाने करून दाखविले याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कमिटीचे अध्यक्ष कृष्णा बामगुडे, उपाध्यक्ष निवृत्ती नलावडे, सेक्रेटरी दत्तू म्हस्के, उपसेक्रेटरी नरेश म्हस्के, खजिनदार कृष्णा पाबेकर, उपखजिनदार उत्तम कदम या सर्व कमिटीने ५०वा सुवर्ण महोत्सव साजरा करण्याकरिता मोलाचे सहकार्य केले.

# खारपाड्यात मोफत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न; ९१ रुग्णांचा सहभाग

**पेण : प्रतिनिधी**



महाराष्ट्र प्रदेश राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष खासदार सुनील तटकरे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या सहकार्याने तसेच मा. आमदार अनिकेत तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली खारपाडा भगतनगर येथे मोरेश्वर भगत शैक्षणिक संस्थेच्या सभागृहात वरदाई ट्रस्ट रोहा व गॅलेक्सी हॉस्पिटल पेण यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या शिबिराचे उद्घाटन पेण विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष नरेंद्र ठाकूर यांच्या हस्ते व पेण तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष तथा मोरेश्वर भगत वाचनालय अध्यक्ष दयानंद भगत यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी गॅलेक्सी हॉस्पिटल संचालक रोहन पंधारे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी संचालक डॉ. रत्नदीप गवळी, प्रणव टेलर, डॉ. रिद्धी कडव, जिते जिल्हा परिषद मतदारसंघ अध्यक्ष सुदर्शन पाटील, राजा राऊत, वडाखळ जिल्हा परिषद कार्याध्यक्ष गजानन ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य अनिता भगत, ग्रामपंचायत सदस्य हिरामण घरत, ज्येष्ठ नेते दत्ता जाधव कृष्णा देसले आदी उपस्थित होते.

मोफत आरोग्य तपासणीमध्ये औषध तसेच इसीजी व रक्त तपासणी करण्यात आली असून या शिबिरात ९१ रुग्णांनी तपासणी करण्यात आली.

# तुराडे ग्रामपंचायतीच्या सीसीटीव्हीचे उद्घाटन, नेत्र चिकित्सा शिबिर

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनीतील तुराडे ग्रामपंचायतीच्या वतीने तहकूब झालेली ग्रामसभा घेण्यात आली. यावेळी ग्रामपंचायतीच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विविध विषयांवर चर्चा होऊन अनेक विकासकामांना मंजुरी देण्यात आली.

सद्यस्थितीत सुरेक्षेचे प्रश्न निर्माण होत आहेत. चोरीचे प्रमाण वाढत आहे. अशा प्रकरणात आळा बसविण्यासाठी सीसीटीव्ही लावण्यात आले. त्याचे उद्घाटन माजी जि. प. सदस्य सुरेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. १५% अनुदानातून तुराडे मुकुंदवाडी येथे सार्वजनिक कार्यक्रमासाठी स्वयंपाकाची भांडी वाटण्यात आली. तुराडे ग्रामस्थांना ग्रामनिधीमधून स्वयंपाकाची भांडी देण्यात आली. लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट मोहोपाडा यांच्या वतीने ग्रामपंचायत येथे नेत्रचिकित्सा शिबिर घेण्यात आले. ४४ रुग्णांनी आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. नेत्र तपासून माफक दरात चष्मे उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

कार्यक्रमासाठी सुरेश ठाकूर, सरपंच रंजना गायकवाड, उपसरपंच लिना ठाकूर, गणेश वर्तक, नाना माळी, वामन चव्हाण, मालती वाघमारे, रिया माळी, अस्मिता मोकल, प्रदीप माळी, विलास पाटील, विश्वनाथ गायकवाड, संतोष वाघमारे, मयूर ठाकूर आदी उपस्थित होते.


**Mahatma Phule Arts, Science & Commerce College, Panvel.**

**Tender Notice**

Mahatma Phule Arts Science & Commerce College Panvel, District-Raigad invites tenders with materials from reputed contractors for Repair Work of Waterproofing of Slab above Seminar Hall (2nd Floor) Details are as follows.

| Work | Area in sqm | Earnest Money Deposit | Tender Cost (Non refundable) |
|---|---|---|---|
| Waterproofing of Slab above Seminar Hall (2nd Floor) | 867.5 | 5725/- | 1000/- |

The tender documents will be available at Mahatma Phule Arts, Science and Commerce College, Panvel from 16/05/2026 to 22/05/2026 between 10.00 a.m. to 5.00 p.m. Last date of Tender Submission is 23/05/2026.

**sd/-**
**Principal,**
**Mahatma Phule Arts,**
**Science and Commerce College,**
**Panvel. Dist- Raigad**



नव्या दिशेने, नव्या विचाराने,
पाऊल तुमचे पुढे पडावे..!
नव्या भविष्याच्या तेजस ज्योतीने,
तुमचे प्रगतीपथ प्रकाशमान व्हावे..!
नगरसेवक तथा माजी सभागृह नेते,
पनवेल महानगरपालिका
श्री. परेश ठाकूर
18 MAY
आपणांस
वाढदिवसाच्या
मनःपूर्वक
शुभेच्छा!
TIPL
शुभेच्छुक
ठाकूर इन्फ्राप्रोजेक्ट्स प्रायव्हेट लि.
an ISO 9001-2015, ISO 14001-2015 & ISO 45001-2018 Certified Company
GROWING STRONG, BONDING STRONGER
Registered office : 1st floor, Om Sadnika, Plot No. 265/1, Panvel-Uran Road, Panvel, Navi Mumbai- 410206.
• Tel. : 022 27452713, 9769409120
• Email : thakurinfraprojects@gmail.com
• Web : www.thakurinfraprojects.in

# उमटे धरणाची अखेर संयुक्त पाहणी

**रेवदंडा : प्रतिनिधी**

गेली अनेक वर्ष उमटे धरण गाळमुक्त व्हावे म्हणून उमटे धरण संघर्ष ग्रुप अथक परिश्रम घेत आहेत. त्यांच्या प्रयत्नाने स्थानिक लोकप्रतिनिधी आणि शासकीय अधिकारी यांनी उमटे धरणाची प्रत्यक्ष पहाणी केली.



परिसरातील नागरिकांना अनेक वर्षे पाण्यासाठी वणवण करावे लागत आहे, हा पाणी प्रश्न सोडविण्यासाठी लोकप्रतिनिधी म्हणून निश्‍चित प्रयत्नशील आहे, मात्र उमटे धरणासाठी राबविण्यात आलेल्या विविध योजनांच्या निधीचा खर्च कागदोपत्रीच असून प्रत्यक्षात केला गेला नाही, असा आरोप नवनिर्वाचित जि.प.सदस्य अनंत गोंधळी यांनी यावेळी केला.

उमटे धरण संघर्ष ग्रुपच्या अथक प्रयत्नानंतर उमटे धरणाची पहाणी राजिप पाणीपुरवठा अभियंता मोहन सरोदे यांच्यासह नवनिर्वाचित जि.प.सदस्य अनंत गोंधळी, प.स.सदस्य संतोष निगडे यांनी केली. यावेळी उमटे धरण संघर्ष समिती अध्यक्ष ॲड. राकेश पाटील, नंदेश गांवड तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ मंडळी यांची उपस्थिती होती.

यावेळी राजिप पाणी पुरवठा अभियंता मोहन सरोदे यांनी उमटे धरणाची प्रत्यक्ष पहाणी करताना, येथील गाळ काढणे का गरजेचे आहे तसेच येत्या पंधरा दिवसात सामाजीक स्तरावर व विविध कंपनीच्या माध्यमातून गाळ काढावे, असे संघर्ष समितीचे वतीने ॲड राकेश पाटील यांनी म्हटले, या बाबीवर सखोल चर्चा येथे करण्यात आली.

उमटे धरणाचे गढूळ पाणी ही समस्या गंभीर स्वरूपाची असल्याचे जि.प.सदस्य अनंत गोंधळी यांनी अभियंता मोहन सरोदे यांचे निदर्शनास आणून दिले. यावेळी त्यांनी येथील पाणी शुध्दीकरण जॅकवेल बंद असल्याचे सांगितले. स्थानिक लोक पाण्यासाठी वणवण करत असून लोकप्रतिनिधी म्हणून उमटे धरण पाणी प्रश्न जिल्हा परिषदेत लावून धरणार असल्याचे गोंधळी म्हणाले तसेच आमदार महेंद्र दळवी यांनी लवकरच सांबरकुंड धरणाचा मार्ग सुकर होईल असे म्हटल्याचे त्यांनी सुतोवाच केले.

यावेळी गोंधळी यांनी उमटे धरणासाठी राबविण्यात आलेल्या विविध योजनांच्या निधीचा खर्च कागदोपत्रीच असून प्रत्यक्षात केला गेला नसल्याचा आरोप केला, तर धरणातील गाळ काढण्यासाठी सामाजीक स्तरावर व विविध कंपनीच्या माध्यमातून ॲड. राकेश पाटील यांचेसह प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी म्हटले.

यावेळी पाणी पुरवठा अभियंता मोहन सरोदे यांनी उमटे धरणासाठी जुन्या योजना राबविण्यात येत आहेत. धरणाचा पाणी प्रश्न सुरळीत होण्यासाठी नवीन योजना कार्यान्वित करणे गरजेचे आहे, जेणेकरून जॅकवेल, शुध्दीकरण यंत्र आदी कामे नव्याने सुरू होतील, असे नमूद केले.

उमटे धरण संघर्ष समितीचे अध्यक्ष ॲड. राकेश पाटील यांनी, धरणातील गाळ काढण्यासाठी सामाजिक स्तरावर प्रयत्न करणे जरूरी आहे. सामाजिक स्तरावर सहकार्य लाभले तर येत्या पंधरा दिवसात या धरणातील गाळ काढता येईल, असे सांगितले.

उमटे धरणातील गाळ काढण्यासाठी, उपसा करण्यासाठी व पाणी समस्या दूर करण्यासाठी परिसरातील ग्रामपंचायतींकडे १५व्या वित्त शिल्लक निधीची रक्कम जिल्हा परिषद अथवा संघर्ष समितीकडे सुपूर्द करावी, असे आवाहनही ॲड. पाटील यांनी यावेळी केले.

उमटे धरण संघर्ष समितीचे कार्यकर्ते नंदेश गावंड यांनी नवनिर्वाचित जि.प.सदस्य अनंत गोंधळी व पं.स.सदस्य संतोष निगडे तसेच शासकीय अधिकारी यांनी उमटे धरणावर प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली याबद्दल आभार व्यक्त केले.

# एकाच मुद्रांक विक्रेत्यामुळे श्रीवर्धनचे नागरिक हैराण!

## कामांसाठी करावी लागतेय तासन्‌तास प्रतीक्षा

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन या तालुक्याच्या मुख्य ठिकाणी मुद्रांक (स्टॅम्प) विक्रीची अत्यंत मर्यादित व्यवस्था असल्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचे चित्र समोर येत आहे. मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, तहसीलदार कार्यालय आवार येथे नरेश दामोदर गंबर हे एकमेव अधिकृत मुद्रांक विक्रेते कार्यरत आहेत, मात्र संपूर्ण तालुक्याचा भार एकाच विक्रेत्यावर असल्याने नागरिकांना तासन्‌तास रांगा लावाव्या लागत आहेत.

श्रीवर्धन तालुक्यातील सुमारे ४२ गावांतील नागरिक विविध शासकीय कामांसाठी जसे की उत्पन्न दाखला, जात प्रमाणपत्र, निवासी दाखला, शैक्षणिक कागदपत्रे, करारनामे, प्रतिज्ञापत्रे, तसेच मालमत्ता व्यवहार यासाठी नियमितपणे स्टॅम्प पेपरची आवश्यकता भासते. सध्या दहावी व बारावीच्या निकालानंतर विद्यार्थ्यांना विविध प्रवेश प्रक्रियांसाठी तातडीने कागदपत्रांची पूर्तता करावी लागत आहे. अशा वेळी मुद्रांक उपलब्धतेतील अडथळे अधिकच गंभीर ठरत आहेत.

एकाच मुद्रांक विक्रेत्यावर संपूर्ण तालुक्याचा भार आल्याने प्रचंड गर्दी होत असून, अनेकदा नागरिकांना दिवसभर प्रतीक्षा करूनही स्टॅम्प मिळत नाहीत, अशी तक्रार समोर येत आहे. त्यामुळे वेळेचा अपव्यय तर होतोच, पण प्रवास खर्च, दैनंदिन कामांमध्ये होणारा विलंब आणि मानसिक तणावही वाढत आहे.

मुद्रांक विक्री ही राज्य शासनाच्या महसूल विभागाच्या नियंत्रणाखालील महत्त्वाची सेवा असून नागरिकांना वेळेवर आणि सुलभपणे स्टॅम्प उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. मात्र, श्रीवर्धनमध्ये या सेवेत स्पष्टपणे तुटवडा जाणवत असल्याने संबंधित अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

श्रीवर्धनमध्ये तातडीने अतिरिक्त मुद्रांक विक्रेत्यांना परवाने देण्यात यावेत. गर्दीच्या पार्श्वभूमीवर स्वतंत्र काउंटर किंवा डिजिटल पर्याय सुरू करावेत. सेवा वेळ वाढवून नागरिकांना दिलासा द्यावा जर सध्याची व्यवस्था नागरिकांना समाधानकारक सेवा देण्यात अपयशी ठरत असेल, तर संबंधित मुद्रांक विक्रेत्याचा परवाना रद्द करण्याची मागणीही जोर धरत आहे.

एकाच मुद्रांक विक्रेत्यावर अवलंबून राहण्याची वेळ का यावी, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. प्रशासनाने तातडीने याची दखल घेऊन योग्य उपाययोजना केल्या नाहीत, तर भविष्यात हा प्रश्न अधिकच तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शेवटी, नागरिकांच्या मूलभूत शासकीय सेवांमध्ये अडथळे निर्माण होऊ नयेत, यासाठी प्रशासनाने आता तरी जागे होणे गरजेचे आहे; अन्यथा जनतेचा रोष वाढण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

### नवीन विक्रेत्यांना परवाने द्या

**श्रीवर्धनमध्ये मुद्रांक विक्रेत्यांची कमतरता नागरिकांसाठी गंभीर समस्या ठरत आहे. परवाना असूनही सेवा न देणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करणे आवश्यक आहे. नियमांनुसार अशा निष्क्रिय परवानाधारकांचे लायसन्स रद्द करण्याची मागणी जोर धरत आहे. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी नवीन मुद्रांक विक्रेत्यांना परवाने देणे गरजेचे आहे. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तातडीने चौकशी करून ठोस निर्णय घ्यावा, अशी जनतेची अपेक्षा आहे. त्यानुसार निर्णय झाल्यास जनतेला सोयीचे होईल.**

# मुरूड समुद्र किनाऱ्यावरील दोन हातगाड्या नगर परिषदेने घेतल्या ताब्यात

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड नगर परिषद हद्दीतील समुद्र किनारी अनेक टपरीधारक आहेत. येथे येणाऱ्या पर्यटकांना न्याहारी व भोजन तसेच चहा व्यवस्था येथूनच मिळत असते, पण व्यवसाय करण्याचे प्रमाण अधिक वाढल्याने जो तो समुद्र किनारी रस्त्याच्या कडेला हातगाडी टाकून व्यवसाय करू लागला आहे. यामध्ये काही हातगाडी टपरीधारक यांना नगर परिषदेची परवानगी आहे, तर काही गाड्या अनधिकृतपणे लावण्यात आल्याची माहिती पालिकेकडून देण्यात आली.

नागरिकांच्या आलेल्या तक्रारीनुसार मुरुड नगर परिषदेने समुद्र किनाऱ्यावर असणाऱ्या दोन गाड्या ताब्यात घेतल्या आहेत. रेखा कंटक या आपल्या गाडीमधून स्प्रिंग पोटॅटो विकत असत, तर दुसरी हातगाडी ही चार वर्षापासून बंद आहे. या मालकाने कोणतीही परवानगी घेतलेली नाही. ज्या जागेचे नगर परिषदेने सुशोभीकरण केले आहे तेथील ही गाडी अगदी प्रवेशद्वाराजवळ ठेवण्यात आली होती. त्यामुळे पर्यटक व स्थानिक नागरिकांना ये-जा करताना अडचण होत होती. या दोन्ही गाड्या जेसीबीच्या साह्याने उचलण्यात येऊन नगर परिषदेने ताब्यात घेतल्या आहेत.

# वाकण ग्रामपंचायतीला बहुमजली इमारत पुरस्कार

**अलिबाग : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील वाकण ग्रामपंचायत हद्दीत महाआवास अभियान सन २०२३-२४ अंतर्गत बांधण्यात आलेल्या बहुमजली इमारतीला 'सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत' या विभागातील द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार शुक्रवारी ( दि.१५) सातारा येथे झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रदान करण्यात आला.



प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत केंद्र शासनाने महाराष्ट्रासाठी ३० लाख घरे मंजूर केली आहेत. त्यातील पाच लाख घरे पूर्ण झाली असून याचा लोकार्पण सोहळा व महाआवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रम सातारा जिल्ह्यातील सैनिक स्कूलच्या मैदानावर पार पडला. या सोहळ्याचे उद्घाटन केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री शिवराजसिंह चौहान आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी ग्रामविकास व पंचायतराजमंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाममंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाद्वारे ग्रामीण भागातील घरकुल योजनांना गती देण्यासाठी आणि सर्वसामान्यांना पक्की घरे उपलब्ध करून देण्यासाठी महाआवास अभियान एक महत्त्वाकांक्षी उपक्रम आहे. या अभियानांतर्गत पोलादपूर तालुक्यातील वाकण ग्रामपंचायत हद्दीतील इमारतीला सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत या विभागातील द्वितीय क्रमांकाचा पुरस्कार देउन गौरविण्यात आले आहे. हा पुरस्कार स्विकारण्यासाठी पंचायत समिती सभापती अविनाश शिंदे, पंचायत समिती सदस्य अनिल दळवी, गटविकास अधिकारी उदयसिंह साळुंखे व वाकण ग्रामपंचायत सरपंच शांताराम जंगम आदी उपस्थित होते.

या पुरस्काराबद्दल रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे यांनी अभिनंदन केले आहे.

# महाडच्या हापूस तळ्याचे सुशोभीकरण संथगतीने

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहरातील गांधारी नाका परिसरात असलेल्या जुने हापूस तळ्याच्या सौदर्यीकरणासाठी सन २०२४मध्ये निधी प्राप्त झाल्यानंतर हे तलाव लवकरच कात टाकणार असे वाटले होते, मात्र दोन वर्ष झाली तरी अद्याप याचे काम संथ गतीनेच सुरू आहे.

महाड शहरातील विविध भागात अनेक प्राचीन तळी आहेत. त्यातील चवदार तळे जागतीक नकाशावर आहे. गांधारी नाका परिसरात महाड शहरात प्रवेश करणाऱ्या मुख्य रस्त्यालगत हापूस तळे आहे. महाड हे बौद्धकालीन व्यापारी शहर म्हणून ओळखले जायचे. पुढे व्यापारी केंद्र म्हणून महाडची ओळख बनली आहे. जवळच असलेल्या बंदरावर शिवकाला आधीपासून मोठी गलबते येत होती. हबशी लोक महाडमध्ये येऊन या तळ्यात अंघोळ करत होते. म्हणून या तळ्याचे नाव हबस तळे असे पडले आणि कालांतराने हबस तळ्याला हापूस तळे म्हणून महाडमध्ये ओळखले जाऊ लागले.

हापूस तळे हे काळाच्या ओघात बुजले गेले, तर तळ्यात रानटी वनस्पतीही उगवलेल्या होत्या. परिसरातील इमारतींचे सांडपाणीही या तळ्यात जात होते. इतिहास काळात महाड हे बंदर होते व येथून मोठ्या प्रमाणात धान्ये व वस्तूंची उलाढाल होत असे. त्याकाळी रस्ते, पूल या सुविधा नव्हत्या. तेव्हा होडीनेच सामानाची वाहतूक होत असे. या होड्यांवर हबशी जमातीचे लोक काम करत होते. या ठिकाणी पाण्याची सोय असल्याने हबशी या ठिकाणी मुक्कामाला उतरत असत. काम संपल्यावर माघारी जात. त्यामुळे या तळ्याला हाबूस व नंतर हापूस तळे असे नाव पडल्याचे जुने जाणकार सांगतात.

हापूस तळे अनेक वर्षे दुर्लक्षित झाले होते. आता या तळ्याचा विकास नगरपालिकेने हाती घेतला आहे. नगरोत्थान अंतर्गत सव्वा कोटी रुपये यासाठी खर्च होणार होते. २०१६ साली याला प्रशासकीय मंजुरी मिळाली, मात्र काही तांत्रिक कारणास्तव हे काम रखडले होते. सध्या तळे साफ करण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. तळ्याचे खोदकामदेखील सुरू असून सभोवताली गॅब्रियन वॉल बांधल्या जाणार आहेत. तळ्याच्या भोवती सुमारे पाचशे मीटरा लांब व सोडेचार फूट रुंद ट्रॅक राहणार आहे. भोवताली बाग, स्वच्छतागृह, पायऱ्या व बाजूने सांडपाणी झिरपू नये यासाठी गटारांची सुविधाही केली जाणार आहे. यामुळे गांधारी नाका परिसरही सुशोभित होण्यास मदत मिळणार होती.

हापूस तळ्यासाठी केंद्र शासन पुरस्कृत अमृत २ योजनेंतर्गत सन २०२४मध्ये पुन्हा सुमारे दोन कोटी रुपये मंजूर झाले. फेब्रुवारी २०२५मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आला. हापूस तलाव परिसरात बहुद्देशीय सभागृह उभे करणे, परिसरात विकास करणे असे या कामाचे स्वरूप आहे, मात्र हे काम देखील संथ गतीनेच सुरु आहे. पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असून अद्याप हे काम सुरूच असल्याने ते कधी पूर्ण होणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.



# कर्जतमध्ये छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील नानामास्तर नगरमध्ये शिवतेज मित्र मंडळाच्या विद्यमाने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सव दिवसभर विविध समारंभांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

नानामास्तर नगरमधील छत्रपती संभाजी महाराज स्मारकाच्या परिसरात शिवतेज मित्र मंडळाने धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सवानिमित्त सकाळी गणेश दिघे व गार्गी दिघे या उभयतांच्या हस्ते अभिषेक आणि पूजन करण्यात आले. त्यानंतर सायंकाळी कर्जत-खालापूर तालुक्यातील वारकरी मंडळीच्या उपस्थितीत पालखी मिरवणूक निघाली. पालखीचा शुभारंभ सुभाष थोरवे आणि दिघे यांच्या हस्ते करण्यात आला. ही पालखी मिरवणूक संपूर्ण नानामास्तर नगरमध्ये फिरली. यावेळी नागरिकांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे दर्शन घेऊन अभिवादन केले.

रात्री महाआरतीनंतर माऊली प्रासादिक मंडळाने मातोश्री हरिपाठ मंडळ अंजप यांच्या सहकार्याने संगीत पोवाड्यांचा कार्यक्रम सादर केला. यावेळी विक्रमबुवा थोरवे, महेशबुवा देशमुख यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावरील पोवाडे सादर केले. त्यांना मृदंगावर विक्रमबुवा थोरवे, तर तबल्यावर मनोजबुवा देशमुख यांनी साथ दिली. त्यानंतर भानुदास पालकर, ज्ञानेश्वर कर्णूक आणि सागर तवळे यांच्या वतीने देण्यात आलेल्या महाप्रसादाचा लाभ उपस्थित नागरिकांनी घेतला.


# रायगड पोलीस दलात नवीन श्वान दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलीस दलातील बॉम्ब शोधक व नाशक पथकातील कार्यरत असलेला श्वान "मॅक्स" हा नियत वयोमानानुसार मयत झाल्यानंतर त्याच्या रिक्त जागेवर नवीन बेल्जियम मेलिनॉईस जातीचा श्वान खरेदी करण्यात आलेला आहे.

बेल्जियम मेलिनॉईस ही श्वानाची एक अत्यंत प्रसिध्द, हुशार, चपळ आणि कार्यरत जात आहे. हा श्वान रायगड पोलीस दलामध्ये दाखल झाला आहे. दाखल झाला तेव्हा त्याचे वय सुमारे नऊ आठवडे इतके होते.

रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी या श्वानाचे



नामकरण बधिरा असे केले आहे. बधिरा हा श्वान भविष्यात स्फोटक पदार्थ शोधक (स्निफर डॉग) म्हणून जिल्हा पोलीस दलामध्ये कार्यरत राहणार आहे.

रायगड पोलीस दलातील यापुर्वी कार्यरत असलेल्या श्वानांनी विविध गुन्ह्यांच्या उकल, स्फोटक पदार्थ शोधक मोहिमा तसेच विशेष बंदोबस्ताच्या कर्तव्यात उल्लेखनीय कामगिरी बजावून रायगड पोलीस दलाची मान उंचावली आहे. त्याच परंपरेत "बधिरा" हाही अत्याधुनिक प्रशिक्षण घेउन रायगड पोलीस दलासाठी प्रभावीपणे कार्य करणार आहे.

या श्वानास प्रारंभी अलिबाग येथील रायगड पोलीस मुख्यालयात वयाच्या पाच महिन्यांपर्यंत प्राथमिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यानंतर पुढील सात महिन्याचे विषेश व अत्यंत खडतर मानले जाणारे स्फोटक पदार्थ शोधक प्रशिक्षण परराज्यात नियोजित करण्यात आले आहे.

पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या मार्गदर्शनाखाली बधिरा या श्वानाचे प्रशिक्षण पूर्ण करण्यात येणार असून प्रशिक्षण कालावधी यशस्वीरित्या पुर्ण झाल्यानंतर तो पुढील १० वर्षे रायगड पोलीस दलातील बॉम्ब शोधक व नाशक पथकात कर्तव्य बजावणार आहे.

नागरिकांची सुरक्षा व जिल्ह्यातील कायदा-सुव्यवस्था तसेच जिल्ह्याला लाभलेल्या सागरी किनाऱ्याची सुरक्षा अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने रायगड पोलीस दल सातत्याने आधुनिक साधने व प्रशिक्षित विशेष पथके विकसित करीत आहे. त्या दृष्टीने उचललेले हे महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

# पत्रकार दत्ता शेडगे यांचा सत्कार

**चौक, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्सप्रेस वे वर गॅस गळती झालेल्या टँकरची माहिती तातडीने प्रशासकीय यंत्रणा, पोलीस व हेल्प फाऊंडेशन यांना देणारे पत्रकार दत्ता शेडगे यांचा सत्कार आमदार महेंद्र थोरवे व आमदार महेश बालदी यांच्या हस्ते व रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत करण्यात आला.



मागील महिन्यात मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर गॅस टँकर पलटी होऊन गळती सुरू झाली होती. या मार्गावर राहणारे पत्रकार दत्ता शेडगे यांना याची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. परिस्थिती अत्यंत चिंताजनक असल्याचे त्यांच्या लक्षात आल्याने त्यांनी खालापूर तहसीलदार अभय चव्हाण, पोलीस, हेल्प फाऊंडेशन खोपोली यांना कळविले. या टँकरमुळे ३६ तास वाहतूक कोंडी झाली होती.

या काळात वाहन चालक, वाहक, प्रवाशी यांना पिण्याचे पाणी, नाश्ता देण्याचे कार्य सामाजिक संस्था यांच्या माध्यमातून पत्रकार दत्ता शेडगे यांनी केले. शेडगे हे नेहमीच घाटातील, द्रुतगती मार्गावरील अपघातग्रस्तांना मदत करतात. घाटातील वाहतूक पोलीस यंत्रणेलादेखील त्यांची मदत असते.

शेडगे यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांचा प्रशासनाच्या वतीने आमदार महेंद्र थोरवे, आमदार महेश बालदी, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी डॉ. किशन जावळे, तहसीलदार अभय चव्हाण यांच्या हस्ते सत्कार झाला.

# लखनऊकडून चेन्नईला पराभवाचा धक्का

**लखनऊ : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६मधील प्ले-ऑफच्या शर्यतीत टिकून राहण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जला (सीएसके) लखनऊ सुपर जायंटस्कडून (एलएसजी) सात गडी राखून पराभवाचा धक्का सहन करावा लागला आहे. लखनऊच्या एकना स्टेडियमवर शुक्रवारी झालेल्या या सामन्यात चेन्नईने दिलेले १८८ धावांचे लक्ष्य लखनऊने अवघ्या १६.४ ओव्हर्समध्ये तीन गड्यांच्या मोबदल्यात सहज पार केले.



लखनऊच्या मिचेल मार्शने अवघ्या ३८ चेंडूंत नऊ चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने ९० धावांची स्फोटक खेळी केली, तर मध्यमगती गोलंदाज आकाश सिंगने भेदक मारा करत २६ धावांत तीन गडी बाद केले. दरम्यान, या पराभवामुळे चेन्नईच्या प्ले-ऑफच्या अडचणी वाढल्या आहेत.

या लढतीत लखनऊने नाणेफेक जिंकून चेन्नईला फलंदाजीसाठी आमंत्रित केले. चेन्नईची सुरुवात खराब झाली. कर्णधार ऋतुराज गायकवाड (१३) आणि संजू सॅमसन (२०) स्वस्तात बाद झाले. या दोघांना आकाश सिंगने तंबूत धाडले. त्यानंतर दोन बाद ३६वरून चेन्नईच्या ५२ धावा झाल्या असताना उर्विल पटेल सहा धावांवर आकाश सिंगची शिकार बनला. त्यानंतर कार्तिक शर्माने खेळाची सूत्रे आपल्या हाती घेत संघाचा डाव सावरत धावसंख्येला आकार दिला. कार्तिकने ४२ चेंडूंत ७१ धावांची खेळी केली. त्यात सहा चौकार आणि पाच षटकारांचा समावेश होता. शहाबाज अहमदने कर्तिकला बाद केले. डेवाल्ड ब्रेविसने १६ चेंडूंत दोन षटकारांसह २५ धावांची जलद खेळी केली. शिवम दुबेने १६ चेंडूंत नाबाद ३२ धावांची धडाकेबाज खेळी करत प्रशांत वीरच्या (नाबाद १३) मदतीने चेन्नईला २० षटकांत पाच बाद १८७ धावांपर्यंत पोहचवले. लखनऊकडून आकाश सिंगने उत्कृष्ट गोलंदाजी करत २६ धावांत तीन बळी घेतले.

१८८ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना लखनऊच्या सलामीवीरांनी चेन्नईच्या गोलंदाजांची अक्षरशः पिसे काढली. सलामीवीर मिचेल मार्शने चौफेर टोलेबाजी करत अवघ्या ३८ चेंडूंत नऊ चौकार आणि सात षटकारांच्या मदतीने ९० धावांची स्फोटक खेळी केली. त्याने अवघ्या २१ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले होते. त्याला जोस इंग्लिसने (३६) चांगली साथ दिली. या दोघांनी पहिल्या विकेटसाठी १३५ धावांची भागीदारी करत लखनऊचा विजय सोपा केला. मुकेश चौधरीच्या फेकीवर मार्श धावबाद झाला. त्याचे शतक दहा धावांनी हुकले.

अखेर निकोलस पुरनने १७ चेंडूंत नाबाद ३२ धावा करत २० चेंडू राखून लखनऊच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. त्याने एक चौकार आणि चार षटकारांची आतषबाजी केली. डावातील १७ व्या षटकांत अन्शुल कांबोजच्या पहिल्या चार चेंडूंवर चारही षटकार मारत सामना संपविला.

# वैदेही पाटीलला राज्यस्तरीय जिम्नॅस्टिकमध्ये कांस्यपदक

**पाली : प्रतिनिधी**

क्रीडा क्षेत्रात आपल्या कौशल्याची चुणूक दाखवत खारघरमधील रामशेठ ठाकूर स्कूलची विद्यार्थिनी वैदेही विवेक पाटील हिने राज्यस्तरीय जिम्नॅस्टिक चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक पटकावून रायगड जिल्हा व नवी मुंबईच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. केवळ आठव्या वर्षी वैदेहीने केलेल्या या चमकदार कामगिरीमुळे सर्व स्तरांतून तिचे कौतुक होत आहे.



नुकतेच रामशेठ ठाकूर स्कूल, खारघर येथे पार पडलेल्या एका विशेष सोहळ्यात वैदेहीचा गौरव करण्यात आला. यावेळी माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते वैदेहीला सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्रक आणि दहा रुपयांचे रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी आणि पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांनी वैदेहीचे कौतुक करताना सांगितले की, इतक्या लहान वयात वैदेहीने जिम्नॅस्टिकमध्ये मिळवलेले यश हे समाजासाठी आणि विशेषतः नवीन पिढीसाठी एक आदर्श आहे. आपल्या यशाबद्दल बोलताना वैदेहीनेदेखील आपले मनोगत व्यक्त केले. ती म्हणाली की, अभ्यासासोबतच खेळाचे महत्त्व मोठे आहे, खेळामुळे आत्मविश्वास आणि शिस्त येते. वैदेहीच्या या यशाने तिच्या पालकांचा आनंद द्विगुणित झाला असून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# पराभवानंतर पाक क्रिकेट संघाला दुहेरी झटका

**दुबई : वृत्तसंस्था**

बांगलादेशने ढाका येथे खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात पाकिस्तानचा दारूण पराभव केला. पाकिस्तानचा बांगलादेशमधील हा पहिलाच कसोटी पराभव होता. या पराभवामुळे पाकिस्तान क्रिकेट संघ आधीच प्रचंड निराश असताना आता आणखी दोन मोठे झटके बसले आहेत. हे झटके त्यांना आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) दिले आहेत.

आयसीसीने पाकिस्तानला 'जागतिक कसोटी अजिंक्यपद' (डब्ल्यूटीसी) गुणतालिकेत मोठा धक्का दिला आहे. क्रिकेटच्या सर्वोच्च संस्थेने पाकिस्तानचे चक्क आठ डब्ल्यूटीसी गुण कापले आहेत. एवढेच नाही तर त्यांची ४० टक्के मॅच फी (सामना शुल्क)देखील आयसीसीने कापली असून यामुळे पाकिस्तान क्रिकेट संघाला मोठा धक्का बसला आहे.

आयसीसीने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पाकिस्तानी क्रिकेट संघाला ही शिक्षा धीम्या ओव्हर रेटमुळे (स्लो ओव्हर रेट) मिळाली आहे. पाकिस्तानचा संघ निर्धारित वेळेपेक्षा आठ ओव्हर्स मागे होता, ज्यामुळे त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आली आहे. पाकिस्तानवर ४० टक्के मॅच फीचा दंड ठोठावण्यात आला आहे तसेच आयसीसी वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप २०२५-२७च्या सायकलमधील आठ गुण कापण्यात आले आहेत.

या कारवाईनंतर पाकिस्तानचे डब्ल्यूटीसी गुणतालिकेत आता केवळ चार गुण उरले असून संघ थेट आठव्या स्थानावर घसरला आहे.

# राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर संघांची विजयी हॅट्ट्रिक

**बदलापूर : प्रतिनिधी**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, कुळगाव-बदलापूर नगर परिषद यांच्या संयुत विद्यमाने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत यजमान मुंबई, पुणे, नाशिक, नागपूरने विजयी हॅट्ट्रिकसह उपांत्य फेरीत मजल मारली आहे.

बदलापूर जिमखाना मैदानावर सुरू असलेल्या राज्य व्हॉलीबॉल स्पर्धेला तिसऱ्या दिवशीही मोठा प्रतिसाद लाभला. विद्युत प्रकाशझोतात रंगलेल्या स्पर्धेत २१ वर्षांखालील मुलीच्या गटात मुंबईने सलग तिसरा विजय संपादन केला. शेवटच्या साखळी लढतीत मुंबईने लातूर विभागाचा २५-१४, २५-११ गुणांनी पराभव करीत आपले वर्चस्व प्रस्थापित केले. उपांत्य फेरीत गटात अव्वल ठरलेल्या मुंबईची नागपूरशी लढत रंगणार आहे. या गटातील दुसरी उपांत्य लढत नाशिक विरूध्द पुणे विभागात होईल. गतविजेत्या नाशिक संघानेही तीन सामने जिंकून विजेतेपदाचे दावेदार असल्याचे दाखवून दिले आहे.



२१ वर्षांखालील मुलाच्या गटात गतविजेत्या लातूरने अपेक्षेप्रमाणे मुसंडी मारली. कोल्हापूर, संभाजीनगर पाठोपाठ अमरावतीला लोळवून लातूर गटात अव्वल ठरला. अटीतटीच्या तिसऱ्या साखळी सामन्यात लातूरने अमरावतीला २५-२०, २५-२१ गुणांनी पराभव करीत त्यांचे आव्हान संपुष्टात आणले. लातूरकडून शेहराज शेख, आफताब कुरेशी, निर्भय देशमुख यांनी आक्रमक खेळ करीत मैदान गाजवले. लातूरची उपांत्य फेरीत नागपूर विरूध्द आमनासामना होईल.

मुलांच्या १८ वर्षांखालील गटात नागपूरने मुंबईला तिसऱ्या सेटपर्यंत रंगलेल्या लढतीत बाजी मारली. तिसऱ्या साखळी लढतीत पहिला सेट नागपूरने गमवला होता. दुसऱ्या सेटमध्ये तुफानी खेळ करीत विजय खेचून आणला. २४-२५, २५-२१, १५-१० गुणांनी नागपूरने मुंबईचे उपांत्य फेरीतील स्वप्न धुळीस मिळवले. वत्सल्य किरटकर, कृष्णा तडसे यांच्या स्मॅशेसच्या जोरावर नागपूरने विजयी हॅट्ट्रिकचा पल्ला सर केला. उपांत्य फेरीत नागपूरची पुणे विरूध्द झुंज होईल.

मुलींच्या १८ वर्षांखालील गटात पुणे संघाने गटात अव्वल स्थान प्राप्त केले. तिसऱ्या साखळी लढतीत नागपूरचा २५-११, २५-७ गुणांनी धुव्वा उडवित उपांत्य फेरीत धडक मारली आहे. पुणे संघातील साक्षी साळुंखे, वैष्णवी अडलिंगे हीने लक्षवेधी खेळ करीत नागपूरला पराभूत केले. गतविजेत्या लातूर संघाने १८ वर्षांखालील मुलींच्या गटात पराभवानंतर तिसरा साखळी सामना जिंकत उपांत्य फेरीचा पल्ला पार केला. उपांत्य फेरीत पुणे विरूध्द लातूर ही एक चुरशीची लढत रंगणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेच्या अंतिम थरारासाठी बदलापूर नगरी सज्ज झाली आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते बक्षीस समारंभ रविवारी संध्याकाळी होणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना २३ लाख ३५ हजारांची रोख बक्षिसे व करंडक, पदके देणार येणार आहेत. साखळी स्पर्धेतील प्रत्येक सामन्यातील विजयी व पराभूत संघ, उपांत्य फेरीतील प्रत्येक विजयी व पराभूत संघ, अंतिम फेरीतील विजयी संघ व अंतिम फेरीतील उपविजयी संघाला रोख बक्षिसे दिली जातील.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com